# ईश्वराचे दर्शन

## प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवी यांचे चरित्र



ईश्वराच्या चेहऱ्यातून आत्मा उदयास आला
आणि जगाची निर्मिती झाली.
.....मोझेस

# ईश्वराचे दर्शन

मूळ लेखक

**योगी महाजन**

(मूळ इंग्रजी पुस्तकाचे मराठी भाषांतर)

**रमण द. कुलकर्णी**



# लेखकाचे मनोगत

‘‘ परमेश्वर असेल तर तो कसा दिसत असेल?’’ परमेश्वराचे दर्शन घ्यावे, ही साधकांची जाज्वल्य इच्छा असते. परंतु काही वेळेस परमेश्वर स्वत: प्रगट होत नाही. मानवी इतिहासाच्या नोंदीमध्ये एकदाच फक्त महाभारत काळात हे घडले होते. त्यावेळी रणक्षेत्रावर अर्जुनाला भगवान श्रीकृष्णांनी आपले ईश्वरीय स्वरूप प्रगट करून दाखविले. असे म्हणतात, की मोझेस यांनी परमेश्वराच्या आज्ञा ऐकल्या. परंतु दृष्टी दीपविणाऱ्या प्रकाशामुळे ते परमेश्वराचा चेहरा पाहू शकले नाहीत. महंमद पैगंबरांना परमेश्वराचे ज्ञान झाले होते, तरी दर्शन झाले नव्हते. पण परमेश्वराचे त्याच्या मुलांवर इतके प्रेम आहे, की गरजेच्या काळात तो मानवामध्ये प्रगट होतो. जसे, श्रीराम, श्रीकृष्ण, ईश्वराचे पुत्र श्री येशु ख्रिस्त आले होते. ईश्वराचे दर्शन हे पुस्तक काही सृष्टीच्या निर्मितीची कथा नव्हे, की सर्वशक्तिमान परमेश्वराचे वर्णन नव्हे, तर हा एक अनुभव आहे. हा अनुभव आहे परमेश्वराच्या सर्वव्यापी प्रेमशक्तीच्या अवतार श्री आदिशक्ती श्रीमाताजी निर्मलादेवी यांच्या सान्निध्यातील प्रेमाचा, भक्तीचा आणि निखळ आनंदाचा. त्यांच्या अनेकविध रूपांचे आणि असंख्य पैलू असलेल्या व्यक्तित्वाचे ज्ञान कोणत्याच मर्त्य माणसाला होणे शक्य नाही, परंतु त्याला जे दिसले ते इतके महान आहे, की ती सुंदरता पाहण्यास दोन्ही नेत्र कमीच पडतात.

त्यांच्या व्यक्तित्वाच्या एकाच अंगाविषयी या पुस्तकात जे लिहिले आहे, ते अपूर्ण आहेच, परंतु त्यात काही उणिवा ही असतील. त्यांचेसाठी मी श्रीमाताजींची विनम्रपणे क्षमा मागतो.

अल्बर्ट आइनस्टाईन हा शास्त्रज्ञ सर्व विज्ञानाच्या पलीकडे असलेल्या ईश्वरी नियमांच्या पडद्यांचे भेदन करून गेल्यावर थक्क झाला आणि उद्‌गारला, ‘मला एवढेच समजले, की मला काहीच ज्ञान नाही. माझे ज्ञान समुद्र किनाऱ्यावरच्या वाळूच्या खड्याप्रमाणे आहे.’ एका मेणबत्तीने सूर्यप्रकाश कसा पाहता येईल? वा मानवी प्रयत्नांतून सृष्टीकर्त्याच्या सौंदर्याचे वर्णन कसे करता येईल? तो फक्त त्या परमेश्वरीचा आनंद आपल्या अंतर्यामी साठवून इतरांना वाटू शकतो. परमपूज्य श्रीमाताजींचे हे चरित्र म्हणजे तो ईश्वरी आनंद सर्वांना वाटण्याचा एक प्रयत्न आहे.

**.....योगी महाजन**

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्राचीन भविष्यवाणी | ६ |
| २ | शालीवाहनांचे वंशज | ९ |
| ३ | बालपण | १३ |
| ४ | स्वातंत्र्य लढ्यात सहभाग | १५ |
| ५ | विवाह | १७ |
| ६ | युवकांसाठी एक उपक्रम | २५ |
| ७ | सहस्त्रार उघडले | २७ |
| ८ | सहजयोग | ३१ |
| ९ | प्रेमाच्या पंखावर भरारी | ३७ |
| १० | श्री गगनगिरी महाराजांची भेट | ४७ |
| ११ | जन्मजात वास्तुशिल्पज्ञ | ४९ |
| १२ | कायद्याची लढाई | ६२ |
| १३ | कृषी | ७० |
| १४ | ईश्वरी अर्थशास्त्रज्ञ | ७२ |
| १५ | संगीताच्या महान आश्रयदात्या | ७६ |
| १६ | चंद्र–सूर्य चरणी लीन | ८० |
| १७ | श्री कल्की | ८४ |
| १८ | परिशिष्टे | ८८ |

# १ : प्राचीन भविष्यवाणी

नाडी ग्रंथ नामक प्राचीन ज्योतिष विषयक पुस्तकात भृगू ऋषींनी १९७० सालात योगाचा उष:काल जगाच्या क्षितिजावर होणार असल्याचे भविष्य वर्तवले होते. 'मानवी जाणिवेत एका नवीन मन्वंतराचा प्रारंभ' असे त्याचे वर्णन भृगू ऋषींनी केले आहे. वैवस्वत आणि कलियुगाचा शेवट होईल तेव्हा मानव त्याच्या परम शक्तीने (आत्मा) राज्य करेल. १९२२ सालात एका योग्याच्या (वेंकटस्वामी) मृत्यूनंतर, एक महायोगी जन्म घेईल. या महायोग्याने परब्रह्माच्या सर्व शक्ती आपल्यामध्ये धारण केल्या असतील. म्हणजेच, त्यांच्यात सर्व कर्तुम्-अकर्तुम्-अन्यथाकर्तुम् शक्ती असतील. पूर्वीच्या युगात सत्याच्या शोधकांना मोक्षाच्या आनंदाच्या प्राप्तीसाठी भक्ती, ज्ञान, पतंजली योग आणि इतर पद्धती आणि साधनांचा अवलंब करावा लागत असे आणि मगच त्यांच्या जीवनाची इतिकर्तव्यता, जीवनाच्या ध्येयाची पूर्ती होत असे.

त्या काळात, निद्रिस्त कुंडलिनी शक्तीची जागृती होऊन तिचे सूक्ष्म चक्रातून उत्थान व्हावे याचेसाठी खडतर तपस्या करावी लागे. परंतु या महायोग्याने निर्माण केलेल्या अभूतपूर्व पद्धतीमुळे साधकांना मोक्षाचा आनंद त्यांच्या जीवन काळातच विनासायास प्राप्त होऊ शकेल. कुंडलिनीचे उत्थान त्यांना याची देही याची डोळा पाहता येईल. जिवंत समाधी घेऊन शरीर त्याग करण्याची गरज पडणार नाही, देहत्याग करण्याची आवश्यकता राहणार नाही, की पुनर्जन्माचा विचार करावा लागणार नाही.

या योगाच्या साधनेतून साक्षात्कार मिळालेल्या जीवांना अन्न, वस्त्र, निवारा इत्यादींची चिंता करावी लागणार नाही. शारीरिक आणि मानसिक व्याधी नष्ट होतीलच व त्यासाठी इस्पितळ नामक संस्थांची रुग्णांना गरज भासणार नाही. त्यांच्याजवळ सूक्ष्म शरीर व इतर शक्ती विकसित करण्याची शक्ती असेल.

श्रीमाताजी निर्मलादेवी यांच्या जीवित कार्यामुळे वरीलपैकी प्रत्येक भविष्यवाणी प्रत्यक्षात उतरली आहे.

ख्रिस्तांनी सुद्धा म्हटले होते, ‘मी पित्याची प्रार्थना करेन आणि ते तुम्हांला सांत्वना देणाऱ्यांना पाठवतील व ते तुमच्याबरोबर सतत राहतील, शिवाय मी तुमच्यासाठी, सांत्वना करणारे, मार्गदर्शक व उद्धारक अशा होली स्पिरीटना पाठवीन. ते तुम्हाला सर्व शिकवतील.’ परम पूज्य श्रीमाताजींचे जीवन म्हणजे ख्रिस्तांच्या वचनांची पूर्तता आहे.



# २ : शालिवाहनांचे वंशज

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासात ख्रिस्त पूर्व २३० या सालापासून ते इ.स.२३० या सालापर्यंत असलेली प्रदीर्घ चार शतकांची शालिवाहन राजाची कारकीर्द, एक विशेष कालखंड मानला जातो. शालिवाहन राजे, वाङ्मय, कला, शिल्प, वास्तुशिल्प आदींचे महान आश्रयदाते होते. त्यांनी व्यापारास फार मोठा पाठिंबा दिला होता. रोम शहराइतक्या दूरवरून व्यापारी शालिवाहनांच्या राज्यात येत असत. शालिवाहन राजांचे जीवन धार्मिक व आदर्श होते.

शालिवाहन राजांच्या उच्च आदर्शाचा व पराक्रमाचा प्रत्यय त्यांच्या वंशातील स्त्रियांच्या जीवनातसुद्धा दिसून येतो. पतीच्या मृत्यूनंतर वैधव्य प्राप्त झालेली राजमाता आपल्या लहान बाळांना धोका असल्याची सूचना मिळताच मध्यरात्री, लहानग्यांसकट नदी पोहून नांदगाव शिंगवे येथे आली. श्री.प्रसादराव सालवे, हे अशा महान पराक्रमी मातेचे असाधारण पुत्र होते. हृदयातील प्रेम व करुणा आणि प्रखर बुद्धिमत्ता यांना सुसंगत असलेल्या उच्च परंपरांमध्येच, त्यांच्या मातेने त्यांचे संगोपन करून त्यांच्या दयाळू पण कार्यक्षम व्यक्तिमत्त्वाचा विकास केला.

ते यशस्वी वकील झाले. चौदा भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. कला, वाङ्मय आणि विज्ञान इत्यादींमध्ये ते प्रवीण होते. पवित्र कुराणाचे त्यांनी हिंदी भाषेत भाषांतर केले होते. पुढे ते स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाले व मध्यवर्ती कायदेमंडळाचे एकमेव ख्रिश्चन सदस्य झाले. श्री.शिवाजी महाराजांच्या माता श्री जिजाबाई ज्या वंशात जन्मल्या त्या जाधव वंशातील कॉर्नेलिया नामक उच्च विद्याविभूषित मुलीशी १९२० साली त्यांचा विवाह झाला. कॉर्नेलियाच्या जन्माच्या वेळी तिच्या वडिलांना दृष्टांत झाला, की ही मुलगी दोन महान अपत्यांना जन्म देईल. म्हणून त्यांनी दोन महान फ्रेंच क्रांतीवीरांच्या आईचे नाव

मुलीला ठेवले.

शालिवाहनांचे वंशज नागपूर येथे एका प्रशस्त बंगल्यात स्थायिक झाले. बंगला नेहमी नात्यातील मुलाबाळांनी गजबजलेला असे. नात्यातील अनेक लहान मोठी मुले खेड्यातून अभ्यासासाठी येऊन राहत. नातेवाईक व मित्रांच्यासाठी बंगल्याची दारे कायम उघडी असत. बंगल्याच्या सभोवतालच्या विस्तीर्ण परिसरात बॅडमिंटनचे कोर्ट होते व भाजीपाल्याचा बगीचा होता.



ईश्वरी कृपेच्या १९२३ सालात, दिनांक २१ मार्च रोजी दुपारी १२:०० वाजता, मध्य भारतातील छिंदवाडा या गावात श्री माताजींचा जन्म झाला. सुहास्य वदनाच्या तेजस्वी बाळाला पाहून आदराने व आश्चर्याने चकित झालेल्या आजीच्या तोंडून उद्गार निघाले, 'ही तर निष्कलंक आहे.' परंतु निष्कलंक हे मुलाचे नाव असल्याने त्याच अर्थाचे निर्मला हे नाव मुलीस ठेवण्यात आले.

ईस्टरच्या सोमवारी या आश्चर्यकारक बाळाचा बाप्तिस्मा मोठ्या

आनंदोत्सवात साजरा झाला. परत येत असताना बग्गीच्या चालकाचा घोड्यावरील ताबा सुटला. कशाला तरी घाबरून घोडे वेगाने माघारी वळले व संपूर्ण बग्गीच कोसळून पडली. सर्वजण बाळाच्या जीविताविषयी चिंताग्रस्त झाले. मोडलेल्या बग्गीच्या ढिगाऱ्याखाली बाळ सुखरूप होते. चेहऱ्यावर नेहमीचेच सुहास्य होते. जवळच दोन सुंदर स्त्रिया उभ्या होत्या.

भारतमाता इंग्रजांच्या जुलुमी राजवटीखाली भरडली जात होती.

श्रीमाताजींचा जन्म म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एका नव्या पर्वाचा प्रारंभ होता.

श्रीमाताजींचा अवतार म्हणजे आदम व ईव्ह यांच्या जन्मानंतरची मानवी उत्क्रांतीमधील सर्वात महत्त्वाची घटना होती.



श्रीमाताजी – वय १६ वर्ष

# ३ : बालपण

निर्मलेचे बालपण अतिशय आनंदी होते. लहानगी निर्मला सर्वांची लाडकी होती. सर्व पशू, पक्ष्यांशीसुद्धा तिची मैत्री होती. काही वेळेस घरातील दासी भयभीत होत असत कारण सापसुद्धा निर्मलेच्या हातात येऊन अंगावर हात फिरवून घेत असत. इतर वेळेस घरातील दूरच्या कोपऱ्यात एकटीच ती ध्यानस्थ बसलेली, चेहऱ्यावर आत्मानंद विलसत आहे, अशी दिसायची. बहुतेक वेळा ती आनंदाने उल्हसित असे. आपल्या खेळातील मुला-मुलींना प्रोत्साहन देऊन नाटके, गाणी व नृत्ये बसवीत असे. वयाच्या सातव्या वर्षी त्यांनी केलेली श्रीकृष्णाची भूमिका पाहतांना मोठ्या संख्येने उपस्थित असलेले प्रेक्षक श्रीकृष्णाचे साक्षात रूप  व माधुर्य पाहून मंत्रमुग्ध झाले होते. त्यांच्या अभिनयातून देवतांशी संपूर्ण तादात्म्य झालेले दिसत होते. लहान वयापासूनच त्यांना संगीत व कला यांची आवड होती.

भूमीचा स्पर्श व्हावा यासाठी शाळेत जातांना त्या पादत्राणे घालत नसत. नवीन ड्रायव्हरला आपल्या मुलीचे वर्णन करतांना श्री माताजींचे वडील अगदी हसत सांगायचे, 'माझ्या मुलीला ओळखणे अगदी सोपे आहे. जिच्या हातात बूट आहेत ती माझी मुलगी.'

सुट्टीच्या काळात निर्मला महात्मा गांधींच्या आश्रमात जात असे. महात्माजी तिला नेपाळी असे संबोधत. आश्रमाच्या सर्व कार्यात तिचा सहभाग असे आणि तिची प्रभावी उपस्थिती महात्माजींनासुद्धा न कळत प्रेरणा देत असे.

संतुलित उत्पन्न, सामाजिक धर्म, साधेपणा, सर्वधर्मांचे एकात्मत्व इ., महात्माजींचे विषय म्हणजे सहज संस्कृतीची नांदी होते. सहजयोगाचे नाव, तसेच धर्मा-धर्मातील कृत्रिम मर्यादा घालविण्यासाठी सर्व धर्मांचे सार एकात्म करावयास हवे-हे गांधीजींना मान्य होते. सहजयोगच खरा उपाय आहे हे

गांधीजींनी स्वीकारले होते व ते म्हणाले, की भारत स्वतंत्र झाल्यावर भारतातच त्याची सुरुवात करता येईल.

गांधीजी फार कडक होते, प्रत्येकास ते पहाटे चार वाजता उठून, स्नान करून पूजेस येण्याची सक्ती करायचे, पण त्यांचा गुण असा होता, की जे सांगायचे ते आचरणातही आणायचे. त्यात भोंदूपणा नव्हता. शिवाय गैरवर्तणुकीमुळे ते फार क्रोधीत होत असत, मग मी त्यांच्यावर थंड पाणी घालत असे. कारण मी लहान मुलगी होते व त्यांना त्याचा अर्थ लक्षात येत असे. ते म्हणायचे, 'या सर्व गोष्टींच्या संबंधात तू इतकी शांत कशी असतेस?' मी सांगायची, 'तोच उपाय आहे. प्रतिक्रिया दाखवून हे साधणार नाही. क्षमा करण्यानेच प्रश्न सुटतो.'

# ४ : स्वातंत्र्य लढ्यात सहभाग

उच्च शिक्षण घेण्याची वेळ आली तेव्हा निर्मलेने वैद्यकशास्त्राची निवड केली. मानवी ज्ञानाची झेप कोठपर्यंत गेली आहे हे तिला जाणून घ्यायचे होते, पण हृदय देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात होते. इंग्रजांच्या जुलुमी राजवटीचे अत्याचार असहाय्यपणे पहात असतांना त्यांचे हृदय पिळवटून निघत होते. हुतात्म्यांसाठी जीव तुटत होता आणि त्या विदारलेल्या हृदयातून उत्स्फूर्तपणे खालील गीत तयार झाले.

**माँ तेरी जय हो, तेरा ही विजय हो।**
**तेरे गीत से आज जग ये जीवित हो।।**
**तेरे गाव के खेत भी गा रहे है।**
**तेरे आज नगरों में जय जय की धून है।।**
**तुझे देख के ये जगी दीन दुनिया।**
**और वो गा रही है, माँ तेरी जय हो।।**
**जब आँखों में आंसू, जुबाँ पे थे छाले।**
**ये दिल गा रहा था, की माँ तेरी जय हो।।**
**चिताए हमारी गगन से भिडी थी और**
**वहाँ लिख रही थी, की माँ तेरी जय हो।।**

तरुण निर्मलेने स्वातंत्र्य लढ्याचे आघात धैर्याने सहन केले. १९२८ सालापासून आई-वडिलांना कारावास सतत सहन करावा लागे. त्यांनी नियमच केला होता की कारागृहात जाण्यासाठी निघतेवेळी कोणीही रडायचे नाही कारण ते अपमानास्पद होते. आई-वडिलांची मुलांना शिकवण होती, की एक दुसऱ्यांच्या आनंदात व दुःखात सारखेच सहभागी झाले पाहिजे. समाज व घर यांच्यात भेदभाव नव्हता. घरात मनमोकळेपणा असला तरी मुलांचे संगोपन परंपरागत

पद्धतीचे होते. उथळपणा व तत्त्वांच्या बाबतीत तडजोड करण्याचा प्रश्नच नव्हता आई-वडिलांना कारागृहात जावे लागे त्यावेळी त्यांच्या अनुपस्थितीत निर्मलेने वयाच्या दहाव्या वर्षापासून घरातील सर्व जबाबदारी सांभाळली. धाकटा भाऊ बाबा याची आईच्या प्रेमाने सर्व काळजी घेतली. दुसऱ्यांच्यासाठी हितकारक काय आहे इकडे तिचे कायम लक्ष असे.

१९४२ सालांत स्वातंत्र्य लढ्यातील विद्यार्थ्यांच्या चळवळीच्या अग्रभागी असल्याने बऱ्याच वेळा निर्मलेलाही कारागृहाच्या वाऱ्या कराव्या लागल्या. एका प्रसंगी इंग्रज सरकारने बर्फाच्या लादीवर झोपण्यास भाग पाडले, पण त्याच्यानंतरही तिची देशभक्ती दुर्दम्यच राहिली. वैद्यकीय महाविद्यालयातून काढल्यामुळे ते शिक्षण सोडावे लागले. आचार्य विनोबा भावे यांनी, स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊ नये म्हणून निर्मलेचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या सांगण्याकडे लक्ष देऊ नये असे तिच्या वडिलांनी निक्षून सांगितले. संपावर असलेल्या विद्यार्थ्यांचे दमन करण्यास पोलीस आले असता कॉलेजच्या गेटसमोर निर्मला एकटीच घोषणा देत पोलिसांच्या बंदुकींना न घाबरता उभी होती. कॉलेजच्या प्राचार्यांना तिचा एवढा शूरपणा पाहून तिच्यामधील विशेष शक्तीची कल्पना आली.

# ५ : विवाह

दिनांक ७ एप्रिल १९४७ या दिवशी एका सुमुहूर्तावर निर्मलेचा, भारतीय प्रशासन सेवेतील महत्त्वाच्या अधिकार पदावर असलेल्या श्री.चंद्रिकाप्रसाद श्रीवास्तव यांच्याशी विवाह झाला. प्रारंभी त्यांच्या सासरकडील मंडळी त्या ख्रिश्चन असल्याने थोडी साशंक होती, पण श्रीमाताजींच्या प्रेमळ स्वभावाने त्यांना जिंकून घेतले. गृहलक्ष्मीचे आगमन झाल्यावर श्रीवास्तव साहेबांच्या सर्व्हिस करिअरमध्ये अचानक उन्नती होण्यास प्रारंभ झाला. पुढे श्री लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले तेव्हा श्रीवास्तव साहेबांची प्रधानमंत्र्यांचे ज्येष्ठ सहसचिव या पदावर नियुक्ती झाली. श्रीमाताजींच्या प्रेमळ स्वभावामुळे शास्त्री परिवारास त्यांच्याबद्दल फार जिव्हाळा वाटे. स्वत: शास्त्रीजी, श्रीमाताजींचा सल्ला घेत असत. शास्त्रीजी व श्रीवास्तव साहेब यांच्यामधील परस्पर प्रेम व जिव्हाळा किती होता याचा प्रत्यय आपल्याला श्रीवास्तव साहेबांनी लिहिलेल्या शास्त्रीजींच्या चरित्रावरून येतो. देशावर आलेल्या कठीण प्रसंगात शास्त्रीजींना सहाय्य करून श्रीवास्तव साहेबांनी देश सेवेत महत्त्वाची कामगिरी बजावली.

श्रीवास्तव साहेबांनी शिपिंग कॉर्पोरेशनच्या चेअरमन पदाची सूत्रे हाती घेतल्यावर श्रीमाताजींनी जहाजांच्या इंटिरियर डेकोरेशनमध्ये आपला बराच वेळ खर्च केला. यातूनच इंटिरियर डेकोरेशनच्या कलेत त्यांना रुची निर्माण झाली. जहाजाच्या सजावटीच्या कलात्मकतेच्या त्यांच्या संकल्पना अस्सल भारतीय होत्या. जहाजांना त्यांनी जी नावे दिली तीसुद्धा भारतीय ऐतिहासिक पुरुषांची होती. काही वेळेस शिपिंग कॉर्पोरेशनच्या कर्मचाऱ्यांसाठी त्या स्वयंपाक करीत असत. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे शिपिंग कॉर्पोरेशनच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या परिवारांमध्ये इतके परस्पर प्रेम व जिव्हाळा निर्माण झाला, की सर्व जणू एकाच कुटुंबाचे सदस्य होते. त्यांच्या एकसंघतेचा परिणाम लगेच दिसून आला. श्रीवास्तव साहेबांच्या कारकिर्दीत शिपिंग कॉर्पोरेशन, ही प्रचंड नफा मिळविणारी

एकमेव सरकारी मालकीची कंपनी होती. त्यांच्या विशेष कामगिरीमुळे केंद्र सरकारने त्यांचा पद्‌मभूषणची पदवी देऊन सन्मान केला.

संयुक्त राष्ट संघामध्ये (युनो) श्रीवास्तव साहेबांनी, मेरीटाईम कॉर्पोरेशनचे, सेक्रेटरी जनरल या सर्वोच्च पदावरून १७ वर्षे महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ सतरा सदस्य देशांनी त्यांना आपापल्या देशातील सर्वोच्च सन्माननीय पदव्या दिल्या. इंग्लंडच्या राणीने नाईटहुडची पदवी दिली. त्या काळात श्रीवास्तव साहेब फारच बिझी असल्याने बराच काळ श्रीमाताजींना एकट्यानेच घालवावा लागे. परंतु त्यांनी केव्हाही तक्रार केली नाही. त्या म्हणत, ‘दीर्घकाळ एकमेकांच्या सहवासात घालविणे आवश्यक नाही, तर सहवासाच्या काही क्षणांमधील आनंदसुद्धा दीर्घकाळ टिकणारा हवा.’ आदर्श पारिवारिक संबंध सातत्याने टिकविले जावेत यासाठी त्यांना वाटणारी कळकळ अशा तऱ्हेने व्यक्त होते. त्यांच्या आध्यात्मिक शिकवणुकीत पारिवारीक जीवनास महत्त्वाचे स्थान दिले आहे. आणि स्वत:च्या वैयक्तिक जीवनातून त्यांनी याचा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या सासरच्या लोकांना त्यांच्याविषयी नितांत प्रेम व आदर आहे. नातेवाईक व मैत्रिणींना त्या हव्याहव्याशा वाटतात. श्रीवास्तव साहेब शिपिंग कॉर्पोरेशन मध्ये होते त्या वेळचे लोक सांगतात, ‘श्रीमाताजी आम्हाला आईसारख्या वाटतात. त्यांच्यामुळे आम्हा सर्वांमध्ये आम्ही एकाच परिवाराचे सदस्य आहोत अशी भावना दृढ झाली होती.’

श्रीवास्तव साहेब आपल्या पत्नीविषयी सांगतात, ‘आम्ही एकत्र राहण्यास सुरुवात केली तेव्हापासून निर्मला समर्पित पत्नीच्या स्वरूपात अडचणीच्या प्रसंगी एखाद्या पहाडाप्रमाणे अविचल राहिली आहे. तिचे गुण अनेक आहेत, पण मी फक्त थोडेच सांगतो. सर्वात प्रथम तिचा सरळ व निरागस स्वभाव. इतरांचे त्रासदायक वागणे तिच्या लक्षात येत नाही. गरीब, आजारी व गरजू लोकांच्याबद्दल तिचे हृदय करूणेने भरलेले आहे.

भुकेल्या मुलांकडे तिला पाहवत नाही. डोळ्यातून लगेच अश्रू येतात. ती

अतिशय उदार असून स्वत:जवळील वस्तू दुसऱ्याला देण्यात तिला मनापासून आनंद वाटतो. कोणत्याही भौतिक गोष्टींची तिला आसक्ती नाही. वैयक्तिक गरजा फारच कमी असून खर्च असा काहीच नसतो.

तिच्या सवयी वाखाणण्यासारख्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत ती राहू शकते व कशाचाही त्रास वाटत नाही. तिच्या जेवणासाठी जे काही बनविले असेल ते आनंदाने व चवीने जेवेल, मग ते कसेही बनविलेले असो.'

श्रीमाताजींचे पती, श्रीमंत कुटुंबातील एकुलता एक मुलगा होते. त्या कुटुंबाच्या मालकीची शेकडो खेडी होती. परंतु नवीन सिलींगचे कायदे अंमलात आल्यावर त्यांच्या मालकीच्या जमिनी काढून घेण्यात आल्या. त्यांच्यामुळे त्या परिवारातील सर्वच व्यक्तींना प्रचंड आर्थिक संकटाशी सामना करावा लागला. निर्मलेने कोणताही विलंब न लावता श्रीवास्तवांच्या वीस तरुण चुलत भावांना आपल्या छत्रछायेखाली घेतले, नोकऱ्या मिळेपर्यंत त्यांना सांभाळले व नंतर त्यांची लग्ने करून दिली. श्रीमाताजी कितीही कार्यमग्न असल्या तरी येणाऱ्या सर्व दूरच्या व जवळच्या नातेवाईकांचा प्रेमाने आदर सत्कार करतात व कोणीही रिक्त हस्ताने परत जात नाही. त्यांना हितकारक काय आहे तिकडे श्रीमाताजींचे सतत लक्ष असते व त्यांचेसाठी त्या सतत प्रयत्नशील असतात. त्यांचे आजारी बंधू श्री.बाळासाहेब सालवे यांच्यावर उपचार करण्यासाठी आपला झंझावाती दौरा त्यांनी बंधू राहत असलेल्या शहराकडे वळविला.

त्यांच्या पारिवारीक जीवनातसुद्धा काही लक्षात राहण्यासारखे प्रसंग निर्माण झाले. एकदा एका व्यापाऱ्याने श्रीवास्तव साहेबांना लाच देण्याचा प्रयत्न केला. दिवाळी भेट देण्याच्या नावाखाली त्याने व्हिस्कीची बाटली एका बॉक्समध्ये घालून दिली. श्रीवास्तव साहेब ऑफीसमधून परतल्यावर त्यांनी बॉक्स उघडून पाहिला तेव्हा ती भेट स्वीकारल्याबद्दल आपल्या पत्नीवर फार क्रोधित झाले. फोन करून त्या व्यापाऱ्याला ते रागवत होते. त्यावेळी त्यांच्या पत्नीने शांतपणे दारू मोरीत ओतून बाटली फेकून दिली. नंतर सगळे शांत झाले.



ब्रॉम्पटन स्क्वेअर लंडन येथील आपल्या घरात कौटुंबिक मित्रांच्या समवेत

श्रीमाताजी दिल्ली येथे राऊझ अव्हेन्यू रस्त्यावरील एका बंगल्यात राहत होत्या. त्यावेळी दिल्ली येथे जातीय दंगे झाले असताना एक पंजाबी जोडपे व त्यांचा मुस्लिम मित्र अचानक त्यांच्या दरवाज्याशी येऊन आश्रय मागू लागले. त्यांची अवस्था बघून श्रीमाताजींनी आपल्या बंगल्याच्या आऊट हाऊसच्या दोन खोल्या त्यांना राहण्यासाठी दिल्या. त्यांचे पती परत आले, त्यावेळी या मंडळींविषयी साशंक होऊन नाराज झाले. परंतु श्रीमाताजींनी त्यांना समजावले. कालांतराने ती मंडळी जागा सोडून गेली. पुढे त्या जोडप्यातील स्त्री अचला सचदेव या नावाची प्रसिद्ध अभिनेत्री झाली व त्यांचा मुस्लिम मित्र साहिर लुधियानवी नावाचा प्रसिद्ध गीतकार झाला.

काही वर्षांनी एका चॅरिटी संस्थेसाठी श्रीमाताजींनी आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात अचला सचदेव यांनी विनामूल्य सहभाग घेऊन त्यांस देणगीही दिली होती. श्रीमाताजींचे ऋण अचला सचदेव अद्यापही विसरल्या नाहीत.

आपल्या बहात्तराव्या वाढदिवसाच्या प्रसंगी आपल्या पतीच्या प्रामाणिकपणाची प्रशंसा करताना त्यांनी लखनौ येथे ते मॅजिस्ट्रेट असताना

घडलेली एक घटना सांगितली. त्या म्हणाल्या, ‘आज ज्यांचा जन्मदिवस आहे अशांपैकी एक माझे पतीसुद्धा आहेत. त्यांनी प्रामाणिकपणासाठी प्रत्येक गोष्टीचा त्याग केला. इतके ते त्याच्याशी एकनिष्ठ होते. एक दिवस मी ग्रंथालयात गेले होते. तेथून बाहेर पडेपर्यंत मुसळधार पावसास सुरुवात झाली, रिक्षा नव्हत्या आणि सरकारी नोकर असल्याने तुम्ही खरोखर गरीब असता व अनेक गोष्टी तुम्हाला परवडत नाहीत. अचानक माझे पती जीपने येताना मला दिसले. मी त्यांना थांबवले. ते म्हणाले की, ‘महत्त्वाच्या कामास जात असल्याने मला थांबता येत नाही व सरकारी जीपमध्ये मी तुम्हाला घेऊ शकत नाही.’ मी म्हणाले, ‘काही हरकत नाही.’ कारण देशभक्ती फार महत्त्वाची आहे. तुम्हाला देशाविषयी काही वाटत नसेल तर तुम्ही काहीच चांगले करू शकत नाही. आपल्या देशासाठी काही तरी चांगले करावे या इच्छेची पूर्तता करण्यासाठी कोणताही त्याग कमीच आहे.’

एकदा अती महत्त्वाची परदेशी व्यक्ती जेवणासाठी आली असता श्रीवास्तव साहेबांना त्या व्यक्तीला काहीतरी भेट द्यायची होती. श्रीमाताजींनी खुर्जा येथे घेतलेली टेराकोटाची एक वस्तू रंगीत कागदात गुंडाळून भेट म्हणून दिली. इतक्या उच्च पदस्थाला अगदी साधी भेट दिल्याचे पाहून श्रीवास्तव साहेबांना धक्काच बसला. काही वर्षांनी श्रीमाताजी त्या अती महत्त्वाच्या व्यक्तीच्या देशास भेट देण्यासाठी गेल्या असता, ती व्यक्ती स्वागतासाठी स्वत: उपस्थित होती आणि त्यांचे घरी श्रीमाताजींनी प्रेझेंट दिलेली टेराकोटाची वस्तू काचेच्या स्पेशल शोकेस मध्ये ठेवलेली आढळली. त्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींनी इतकी दुर्मीळ व नैसर्गिकरीत्या कलात्मक असलेली वस्तू प्रेझेंट दिल्याबद्दल श्रीमाताजींना पुन्हा एकदा धन्यवाद दिले.

अशा प्रसंगात श्रीमाताजी शांत रहात असत. त्यांची अंतरीची शांतता व प्रेम यांच्यामुळे त्यांच्या पतीचा राग केव्हाच शांत होत असे. आणि त्यांनतर त्यांच्यासाठी रूचकर जेवण व पत्नीचे हास्य-विनोद तयार असे. दुसऱ्या दिवशी

ऑफीसमधून परत येतांना श्रीवास्तव साहेब काहीतरी चांगली वस्तू प्रेझेंट आणायचे.

श्रीमाताजींना दोन प्रेमळ मुली आहेत-कल्पना आणि साधना. दोघींचेही विवाह झाले असून कल्पनाला आराधना आणि अनुपमा नामक दोन मुली आहेत, तर साधनास एक मुलगा-आनंद आणि मुलगी-सोनालिका आहेत. दोघींनी श्रीमाताजींच्या कार्यास पूर्णपणे वाहून घेतले आहे.



नाईटहुडची पदवी प्रदान करण्याच्या समारंभानंतर श्रीवास्तव परिवार
(पाठीमागे उभ्या-कल्पना व साधना)



‘सहस्त्रार उघडेपर्यंत मी शुद्ध खादी वापरत होते. माझे पती कलेक्टर व इतर मोठ्या पदांवर होते. त्यांना चांगल्या कपड्यांची आवड आहे.’ ते म्हणायचे, ‘काहीतरी चांगले वापरा.’ मी म्हणायची, ‘हे सगळ्यात चांगले आहे.’ मी सतत खादीच वापरत राहिले. मला त्यात मोठे समाधान वाटले आहे. कारण या माझ्या देशात खेड्यामध्ये लोक खादी तयार करतात.

# ६ : युवकांसाठी एक उपक्रम

त्या काळात, राष्ट्रीय पुनर्निर्माण व विकास कार्यात तरुण पिढीच्या शक्तीचा उपयोग व्हावा याचेसाठी श्रीमाताजींनी १९६१ साली, 'युथ सोसायटी फॉर फिल्म्स' नावाची एक संस्था सुरू केली. करमणुकीच्या विशेषतः सिनेमाच्या प्रभावी माध्यमातून तरुण वर्गावर राष्ट्रीय, सामाजिक व नैतिक मूल्ये बिंबविली जावीत या हेतूने चांगली व निर्मळ करमणूक करणाऱ्या कार्यक्रमांना आश्रय दिला जावा व त्यांचा प्रचार व्हावा हा युथ सोसायटी या संस्थेचा उद्देश होता. या प्रसंगी काढण्यात आलेल्या स्मरणिकेत श्रीमाताजींनी एक सुंदर लेख लिहिला होता, त्याचा अंश खाली उद्धृत करीत आहे. 'कलाकारांनी लोकांची दृष्टी आपल्या स्वतःच्या अभिरूचीच्या उच्च स्तरापर्यंत उन्नत करावी. लोकांच्या निम्नस्तरीय मागणीची पूर्तता करण्यासाठी खाली झुकून आपले स्वातंत्र्य घालवू नये. याच्यासाठी प्रबोधित कलाकारांना सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी संपर्क साधता येईल. अशा कलाकारांच्या कल्पनांचा प्रचार वृत्तपत्रे व मासिके यांच्यात लेख लिहून करता येईल. खऱ्या कलाकृतींची लोकांना समज यावी म्हणून नाटके, चित्रपट, रेडिओ वरील भाषणे इत्यादींच्या माध्यमातून लोकशिक्षण साधता येईल. अशा पद्धतीने कलेची श्रेष्ठता टिकविता येईल. सर्वसामान्य लोकांशी अशा प्रकारे संस्थांचे माध्यमातून संपर्कात राहिल्याने कलाकाराचा सामाजिक आत्मा अधिक संवेदनशील अंगात विकसित होईल. मग देशातील थोड्याशा अशांततेची वा सामाजिक असंतुलनाचीसुद्धा प्रतिक्रिया उमटेल. उदा.रस्त्यात एक महारोगी दिसला तरी कलाकाराच्या हृदयातून प्रकटलेल्या सहानुभूतीच्या वर्षावाने आपल्या कलेच्या माध्यमातून तो असे वातावरण निर्माण करेल की त्यांच्यामुले सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, वैज्ञानिक व शासनामधील जबाबदार लोक यांना महारोगाच्या प्रश्नाचा विचार करून काहीतरी उपाययोजना करणे भाग पडेल. कलाकाराला जर आपले देशबांधव, भेकड व देशभक्तीशून्य आढळले तर

आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून तो त्यांच्या मनावर खोल परिणाम करू शकेल. कलाकार म्हणजे इतकी शक्ती आहे! कलाकार, सृष्टी निर्माण करणाऱ्याने घडविलेली सर्वांत सुंदर फुले आहेत. सृष्टीकर्त्याचे सर्वात मधुर स्वप्न आहेत. समाजाचे सर्वात प्रिय असलेले घटक आहेत. प्रेक्षकांचे त्यांच्यावर किती प्रेम आहे, प्रेक्षक त्यांची किती पूजा करतात व अनुयायीत्व करतात याची कदाचित कलाकारांना अद्याप जाणीव नसावी.'

श्रीमाताजींच्या संकल्पनांमुळे मुंबईतील अनेक तरुण कलाकारांच्या विचारात फरक पडून त्यांनी आपल्या बुद्धिचा, बीभत्स चित्रपट काढण्यात अपव्यय करण्याऐवजी कलात्मक चित्रपट करण्याकडे उपयोग करण्यास सुरुवात केली. श्रीमाताजींनी स्वत: 'रात पागल हो गई' नावाचे एक नाटक लिहिले होते.

त्या फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या सदस्या होत्या. त्या काळात भारतीय चित्रपटातील निरागसता सांभाळण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे कार्य केले.

# ७ : सहस्त्रार उघडले

इंग्रजी साम्राज्यावर सूर्यास्त झाला. जागतिक युद्धांचा काळ संपुष्टात आला. नव्यानेच स्वतंत्र झालेले देश स्वातंत्र्याची पहिली वर्षे आनंदात काढत होते. परंतु एक विषारी साम्राज्यवाद नकळत मानवी मनावर प्रभुत्व मिळवीत होता. होली स्पिरीट, आदिशक्तीच्या विरोधात त्याने हातात उघडपणे शस्त्र न घेताही मोठे युद्ध पुकारले होते. सिगमंड फ्रॉईडचा राक्षसी सिद्धांत पाश्चात्त्य जगात वणव्यासारखा पसरत होता. सर्व मानसिक आजारांच्यावर वैषयिक स्वैराचार हाच उपाय आहे हा विचार सर्वांच्या मनात घर करीत होता. धार्मिक परंपरांच्या अभावी आणि त्यात व्यक्ती स्वातंत्र्याची भर पडल्याने आधुनिक कुंभ (ॲक्वेरियन) युगांत अनिर्बंध विषयोपभोगास सर्वत्र मान्यता मिळत होती. हिप्पी, युप्पी, पंक आणि इतर तशाच पंथातील लोक प्रस्थापित तत्त्वांना सुसंगत अशा जीवन प्रणालीपासून विभक्त होऊन मनमानी जीवनाचा मार्ग आचरीत होते. ख्रिश्चन चर्चमधील भ्रष्टाचार व दांभिकता यांच्यामुळे सर्वांच्यात भर पडत होती. अधिक प्रवचने ऐकण्याची युवा वर्गाची यापुढे तयारी नव्हती. ते शोधत होते, पण त्यांना कळत नव्हते की ते कशाच्या शोधात आहेत. योगाच्या नावाखाली बाजार मांडून बसलेले हृषिकेशचे विक्रेते झटपट श्रीमंत होण्याच्या महत्त्वाकांक्षेने पाश्चात्त्य जगातील पोकळी भरण्यासाठी धावले व त्यांनी सेक्स ते समाधी, तृतीय नेत्राची दृष्टी, सर्प शक्ती यांना व योगाच्या नावाखाली इतर जे काही पैसा देऊन जाईल त्या सर्वांना विक्रीसाठी मांडले.

याचवेळी भारतात निराळे दृष्य दिसत होते. धर्माचार्य आणि स्वत:स भगवान म्हणविणारे यांनी परमेश्वराचा ताबा घेतला. उपदेश आणि त्याप्रमाणे अपेक्षित आचरण, यांच्यामध्ये दिसून येणाऱ्या फरकामुळे माणसाची द्विधा मन:स्थिती झाली होती. यांच्या उलट दुसरीकडे परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी काही तपस्वी स्वत:सच त्रास करून घेत होते.



अशाप्रकारे पूर्वेकडे संस्कारांचा प्रश्न तर पश्चिमेकडे अहंकाराचा, या दोन्हीच्या मधे श्रीमाताजी विचार करीत होत्या, की आधुनिक काळातील असंख्य साधकांना एकत्र आत्मसाक्षात्कार कसा देता येईल. त्यांना गुरू नानकांचे शब्द आठवले, 'सर्वत्र अंधकार असताना सत्य कसे सांगायचे.' पण प्राचीन नल-दमयंती पुराणात कलीने नलाला कलियुगाची महती सांगितली होती. 'ज्यावेळी घोर कलियुगाचा भूमी मातेला त्रास होईल, तेव्हा आदिशक्ती अवतार घेईल आणि ईश्वराच्या शोधार्थ जंगलात, दऱ्यात आणि डोंगरात जाऊन साधना करणाऱ्यांना मुक्ती देईल. ते लोक कलियुगात संसारी लोक म्हणून जन्म घेतील व पारिवारीक जीवनातच आदिशक्ती त्यांना आत्मसाक्षात्कार देईल.'

श्रीमाताजींनी, तथाकथित भगवान, आचार्य काय करीत आहेत हे पहायचे ठरविले. श्रीमाताजी आपल्या बंधूंच्या घरी जबलपूर येथे गेल्या असता त्यावेळचा तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक रजनीश याने त्यांना ओळखले व साष्टांग नमस्कार घालून आदिशक्ती म्हणून त्यांची स्तुती केली. श्रीमाताजींना आपण ईश्वरी अवतार आहोत हे अद्याप प्रकट करायचे नव्हते.

श्रीमाताजींचे पती शिपिंग कॉर्पोरेशनचे चेअरमन आहेत हे समजल्यावर



त्याने आपल्या व्यावसायिक मित्रांची अनेक काम करून घेण्याचा प्रयत्न केला. स्वत:चे कार्य श्रीमाताजींनी पहावे याचेसाठी तो श्रीमाताजींना सारखे विनवित राहिला. तो आश्वासन देत असे, की आपले कार्य श्री माताजींना आवडेल. शेवटी अनिच्छेने श्रीमाताजींनी मुंबई जवळ नारगोळ येथे दिनांक ४ मे १९७० रोजी रजनिशच्या सेमिनारला भेट देण्याचे मान्य केले. अध्यात्माच्या नावाखाली रजनीश लोकांना कसा लुटत होता ते पाहून त्यांना धक्काच बसला व शिसारी आली. ती सर्व रात्र त्यांनी समुद्र किनाऱ्यावर चिंतनात घालवली. दुसऱ्या दिवशी पहाटे असत्याविषयी तिटकारा आणि आपल्या मुलांना त्यातून वाचवावे ही करुणा, यांच्यातून दिनांक ५ मे १९७० रोजी त्यांनी सहस्रार उघडले. सहस्रार उघडण्याचा प्रसंग त्यांनी खाली शब्दात वर्णिला आहे.

कुंडलिनी शक्तीचे जी आपल्यामधील आदिशक्ती आहे, होली घोस्ट आहे, एखाद्या टेलिस्कोपप्रमाणे उत्थान होताना व उघडताना मला दिसले. मग मला सर्व (सहस्रार) उघडताना दिसले आणि शक्ती स्तंभाचा मुसळधार पाऊस माझ्या मस्तकातून सगळीकडे प्रवाहित होऊ लागला. मला वाटते मी आता हरवले, आता अस्तित्वात नाही, फक्त शक्तीच आहे. हे सर्व होत असताना मी पाहिले, 'तो सहजयोगाचा प्रारंभ होता, जे कार्य सार्थ करण्यासाठी त्यांचा अवतार होता, जे फक्त त्याच, आदिशक्तीच, साध्य करू शकत होत्या.'




**सूक्ष्म यंत्रणेद्वारे मुळाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास**

| | | |
|---|---|---|
| १–मूलाधार | २–स्वाधिष्ठान | ३–नाभी |
| ३अ–भवसागर | ४–अनाहत | ५–विशुद्धी |
| ६–आज्ञा | ७–सहस्त्रार | |

# ८ : सहजयोग

आत्तापर्यंत आपण फक्त अहंकाराची शक्ती वापरली, कारण आपण प्रेमाची शक्ती जाणलीच नाही. प्रेम ईश्वरी शक्ती आहे आणि ती कशी वापरायची ते सहजयोग शिकवितो. परमेश्वराशी धर्माचा संबंध जोडणे म्हणजे केवळ बौद्धिक संकल्पना असून ते अवास्तव आहे. आपण भरकटू लागल्यास आपल्याला रोखू शकणारी शक्ती आपल्यात नाही. उदा.नशा आणणारे पदार्थ व मद्य, इत्यादीचे सेवन करण्यापासून आपल्याला कोणतीही शक्ती थांबवू शकत नाही. परंतु आपल्यामध्ये अस्तित्वात असलेल्या कुंडलिनी नामक उपकरणामुळे आपण आपल्याला निर्माण करणाऱ्या सर्वव्यापी शक्तीशी संलग्न होऊ शकतो आणि ते टिकवून ठेवण्यासाठी आचरणाची तत्त्वेही विकसित करू शकतो. सहजयोग हे आपल्याला सामूहिक चेतनेच्या मुख्य प्रवाहाशी संलग्न करणारे विज्ञान आहे. श्रीमाताजी, कुंडलिनी जागृत करून आपल्याला परमेश्वरी प्रेमाच्या सर्वव्यापी शक्तीशी संलग्न करतात.

सहज याचा अर्थ (सह+ज) आपल्याबरोबर जन्मलेला. जे अंगभूत आहे, आपोआप प्रकट होते. विनासायास, सोपे आणि उत्स्फूर्त, जसे बीजच वृक्षात वृद्धिंगत होत, वृक्षांना फुलांचा बहर येतो आणि फुलांचे फळात परिवर्तन होते. कितीही मानवी प्रयत्न केले तरी बीजाच्या वृक्षात वृद्धिंगत होणाऱ्या प्रक्रियेत बदल होऊ शकत नाही. झाड वाढते आहे एवढेच फक्त माळी बघू शकतो. तद्वत आपल्या चेतनेचा विकास घडवून उत्क्रांती अधिक प्रगत करणारी क्रिया विनासायास घडून येते.

मानव गर्भावस्थेत असतांना सर्वव्यापी ईश्वरी प्रेमातून आलेले चेतनेचे किरण मानवी मेंदूत प्रवेश करून त्यास प्रकाशित करतात. मेंदूचा आकार लोलकाप्रमाणे असल्याने शक्तीचे किरण चार भागामध्ये परावर्तित होतात आणि

त्यामधून मानवी नाडी संस्थेची चार अंगे विकसित होतात.

१) पॅरासिंपथॅटिक नाडी संस्था

२) सिंपथॅटिक नाडी संस्था (उजवी)

३) सिंपथॅटिक नाडी संस्था (डावी)

४) मध्यवर्ती मज्जासंस्था

टाळूवर पडणारे शक्तीचे किरण मधोमध छेद करून सरळ सुषुम्ना नाडीमधून मेड्यूला ऑब्लांगटामध्ये प्रवेश करतात. त्याठिकाणी धाग्याप्रमाणे पातळ रेषा सोडून ही शक्ती पाठीच्या कण्याचे शेवटी असलेल्या त्रिकोणाकृती अस्थीमध्ये (मूलाधार) साडे तीन वलये घालून राहते. यास कुंडलिनी असे म्हणतात.

सूक्ष्म शक्ती, मेंदूच्या केंद्र स्थानातून (सहस्रार-ब्रह्मरंध्र) आत प्रवेश करते. आणि खाली जाताना सहा शक्ती केंद्रांची स्थापना करते. मज्जारज्जूच्या आतील सुषुम्ना नाडीमधील सूक्ष्म शक्तीचे स्थूल स्वरूप पॅरासिंपथॅटिक नाडी संस्था हे आहे. तसेच सूक्ष्म चक्रांचे स्थूल स्वरूप आहे प्लेक्सेस. ती मज्जारज्जूच्या बाहेरील बाजूस असतात. यांस सर्वांस 'स्वयंचलित नाडी संस्था' असे म्हणतात. या संस्थेद्वारे परमेश्वरी प्रेमाच्या शक्तीचा पुरवठा होत असतो. परंतु मुलाचा जन्म झाल्यानंतर त्याची नाळ कापल्यावर सुषुम्ना नाडीमध्ये पोकळी तयार होते. त्या पोकळीस तत्त्वज्ञानात 'व्हॉईड' असे म्हणतात व भारतीय तत्त्वज्ञानात 'भवसागर' असे म्हणतात. नंतर अहंकार आणि प्रतिअहंकार फुग्याप्रमाणे फुगतात आणि मेंदूच्या सर्वोच्च ठिकाणचा भाग झाकला जातो, मग टाळूचा भाग कठीण होतो. त्याच्यामुळे परमेश्वरी प्रेमाच्या सर्वव्यापी शक्तीचा उपयोग सिंपथॅटिक नाडी संस्थेच्या द्वारे होतो. डावीकडे व उजवीकडे अशा दोन निराळ्या संस्था असून या दोन नाड्यांमधून सूक्ष्म स्वरूपात मेड्युला ऑब्लांगटामध्ये ईडा आणि पिंगला नाड्यांच्या रूपाने सूक्ष्मशक्ती प्रवाहित होते. उजव्या बाजूच्या संस्थेमुळे जागृत चेतनेच्या कार्यासाठी शक्ती पुरवठा होत असतो व डाव्या बाजूच्या संस्थेमुळे सूप्त

चेतनेतील मानसिक अंगास शक्ती पुरवठा होतो.

सहजयोगाच्या शोधामधून मानवी जाणिवेस उच्च पातळीवर परिवर्तित करणे शक्य झाले आहे. मूलाधारामध्ये (माकड हाड) कुंडलिनीचे ठोके उघड्या डोळ्याने पहाता येतात आणि त्याचप्रमाणे चक्रांची स्थानेही मज्जारज्जू वरती त्या स्थानांना स्पर्श केल्यास लक्षात येतात. पूर्वी सुषुम्ना नाडीमधील पोकळी भरून काढणे दुस्तर वाटत असे, परंतु आता लक्षात आले आहे, की ईश्वरी प्रेमाच्या चैतन्य शक्तीने ही पोकळी भरली जाते. कुंडलिनीचे उत्थान होऊन साधकास कोणताही त्रास न होता ती मस्तकातील टाळूच्या भागातील ब्रह्मरंध्राचे छेदन करते.

हे सर्व, दोन विचारातील विलंबात, क्षणार्धात, घडून येते. परंतु आजारी व्यक्तीमध्ये अथवा सिंपथॅटिक संस्थेच्या अधिक कार्यामुळे चक्रे आकुंचित झाली असल्यास, कुंडलिनी प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक आई असल्याने तसेच तिच्यात सर्व प्रेम, सौंदर्य आणि ज्ञान असल्याने, आपले प्रेम कसे सुंदरतेने व्यक्त करायचे आणि मुलास त्रास न होता त्यास पुनर्जन्म कसा द्यायचा हे तिला चांगले समजते.

माणसाचे चित्त त्यांच्या आंतरिक चेतनेमध्ये गेल्यास ते प्रत्येकाच्या कुंडलिनीकडे जाऊ शकते. दुसऱ्या व्यक्तीची कुंडलिनी, तिची स्थिती व स्थान इत्यादी सर्वांची जाणीव होऊ शकते. सामूहिक चेतना अशा तऱ्हेने प्रस्थापित होते. साधक वैश्विक देहात विकसित होतो. प्रेमाची शक्ती इतकी महान व कार्यक्षम असते, की केवळ बोटांच्या हालचालींनी हजारोंची कुंडलिनी हलविता येते. सत्याच्या सुवर्ण युगाची, सत्य युगाची पहाट अवतरल्याची ही सुचिन्हे आहेत.

सहजयोगाने संतुलन प्रस्थापित होऊन मानवी समस्यांचे निराकरण होते. आदिशक्तीची शुद्ध हृदयाने पूजा करणारे हजारो लोक, कॅन्सर, अपस्मार सारख्या दुर्धर आजारांतून मुक्त झाले आहेत. तीन डॉक्टरांनी (दमा, हायपरटेन्शन व

ब्राँकायटीस यांच्यावर सहजयोगाचे उपचार) या विषयांवर केलेल्या संशोधनास दिल्ली विद्यापीठाने मान्यता देऊन त्यांना एम.डी.ची पदवी दिली. डॉ.उमेशचंद्र राय यांनी 'प्रकाशित वैद्यक शास्त्र' या नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. सध्या रक्ताच्या कर्करोगावर चैतन्य लहरी देऊन उपचार करण्याविषयी संशोधन करण्यात येत आहे.

लोक जसे आत्मसाक्षात्कारात प्रस्थापित होऊ लागले तसे त्यांचे आर्थिक प्रश्न, वास्तूचे प्रश्न, वगैरे आश्चर्यकारकरीत्या सुटले. श्रीमाताजींच्या फोटोमधून चैतन्य लहरी प्रवाहित होऊन त्यांनी आजारी लोक व्याधीमुक्त झाले. हे सर्व असूनही श्रीमाताजी सर्वसामान्य लोकांना गृहकार्यात मग्न असलेल्या गृहिणीप्रमाणेच भासतात. ही त्यांची माया आहे कारण त्या महामाया आहेत.

श्रीमाताजींना लोकांविषयी त्या व्यक्तीच्या चैतन्य लहरी वरून समजते. नेहमी, भेटावयास आलेली शिष्यमंडळी घराच्या बाहेर असतानाच कोण आले आहे हे श्रीमाताजींना समजते. कारण त्यांना त्या शिष्याची व्हायब्रेशन्स (चैतन्य लहरी) जाणवू लागतात. शिवाय दूर अंतरावर असलेल्या व्यक्तीसही त्यांच्याकडे चित्त दिल्यास किंवा त्यांच्या फोटोच्या माध्यमातून चैतन्य लहरी देता येतात. एकदा इंग्लंडमध्ये एका शिष्याला व्हायब्रेशन्स वरून त्यांनी सांगितले की तुझ्या वडिलांना नुकताच हृदयविकाराचा झटका आला होता. श्रीमाताजींनी त्यांच्या वडिलांवर चित्त दिले. दुसऱ्या दिवशी त्यांचा फोन आला, की आपली प्रकृती आश्चर्यकारकरीत्या सुधारली आहे. १९९५ साली श्रीमाताजी थायलंड या देशात गेल्या असता त्या देशाच्या राजाची प्रकृती गंभीर होती. थायलंडच्या सहजयोग्यांनी श्रीमाताजींना प्रार्थना केली. श्रीमाताजींनी राजांना व्हायब्रेशन्स पाठविली. राजांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होऊ लागली व दुसऱ्या दिवशी राजांनी स्वत: चालत जाऊन आपल्या आईस तिच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

निराबाधित सत्याचा पडताळा व्हायब्रेशन्सवर घेता येतो. प्रश्न विचारल्यावर थंड व्हायब्रेशन्स ते सत्य आहे असे दर्शवितात. याचे उलट उष्ण



व्हायब्रेशन्स नकारार्थी उत्तर दर्शवितात. उदा.श्रीमाताजींचे फोटोसमोर प्रश्न विचारला की, 'येशू ख्रिस्त ईश्वराचे पुत्र होते का? परमेश्वर जगन्नियता आहे का?' अथवा 'श्रीमाताजी आदिशक्तीच्या अवतार आहेत का?' थंड चैतन्य लहरी वाहू लागतात आणि सत्याची ग्वाही देतात.

# ९ : प्रेमाच्या पंखावर भरारी

चिनी भाषेत एक जुनी म्हण आहे, 'पहिले पाऊल उचलताच दहा हजार मैलांच्या प्रवासाची सुरुवात होते.' सहजयोगाचा प्रारंभ मुंबई आणि दिल्ली येथे काही थोड्या साधकांच्या बरोबर झाला. मित्रांनी त्यांच्या घरी आयोजित केलेल्या लहान कार्यक्रमात श्रीमाताजी आत्मासाक्षात्कार देत असत. स्वत:विषयी फार थोडेच बोलत. पण साधकांची चक्रे प्रस्थापित करण्यास तासन् तास न थकता कष्ट करीत.

हळू हळू सार्वजनिक कार्यक्रमात अनेक लोकांना आत्मसाक्षात्कार देण्यास प्रारंभ केला. सहजयोग्यांची संख्या काही शेकड्यांमध्ये गेली. दिल्ली व मुंबई येथे सहजयोगाची केंद्रे ही स्थापन झाली. किती जण सहजयोगी झाले याच्यापेक्षा त्यांची गुणवत्ता कशी आहे या बाबतीत श्रीमाताजी दक्ष होत्या. त्यांनी आत्मसाक्षात्कार देण्यास केव्हाही पैसे घेतले नाहीत. स्वत:च्या उत्पन्नातून सहजयोगाची सुरुवात केली.



अमेरिकन साधक अगुरूंच्या आहारी जाऊन स्वत:चा विनाश ओढून घेत होते. त्यांना कसे वाचवावे याची श्रीमाताजींना चिंता होती. १९७२ साली त्यांनी स्वत:च्या सोन्याच्या बांगड्या विकल्या व त्या पैशांनी त्या जहाजाने अमेरिकेस गेल्या. खोट्या गुरूंचा खोटेपणा उघडा पाडून त्यांनी लोकांना इशारा दिला की स्वैर व विकृत विषयोपभोगाने ते एका महाभयंकर रोगाचे शिकार होणार आहेत. पण व्यक्ती स्वातंत्र्याच्या नशेमुळे लोकांनी त्यांच्या इशाऱ्याची दखल घेतली नाही. काही वर्षानंतर एडस् या आजाराने अमेरिकन लोक रोगग्रस्त होऊ लागले. जहाजाने परत येत असताना अमेरिकन लोकांच्या स्थितीने त्या दु:खी होत्या, आपल्या मुलांना कसे वाचवायचे इकडे त्यांचे हृदय ओढ घेत होते. त्यांच्या हृदयातील प्रेम उत्स्फूर्तपणे खालील कवितेत व्यक्त झाले.

माझ्या फुलांसारख्या बाळांनो, जीवनाशी तुम्ही भांडता आहात,
अंधारात ज्यांना आपली आई सापडत नाही, अशा मुलांच्यासारखे।
तुमच्या प्रवासाची विफलता पाहून, तुम्ही नैराश्याने ग्रासले गेलात,
सौंदर्याचा शोध घेण्यास, बिभत्सपणा लेऊन बसलात,
सत्य सत्य असे समजून, असत्यालाच धरून बसलात।
प्रेमाचा प्याला भरण्यास, सर्व भावना रित्या केल्यात,
माझ्या गोड मुलांनो, माझ्या बाळांनो, स्वत:शीच युद्ध करून,
स्वत:लाच छळून आणि आनंदाचा बळी देऊन,
कधी शांतता मिळते का।
कृत्रिम शांतवनाच्या चेहऱ्याआड दडविलेला,
सर्वसंग परित्याग प्रयत्न, आता पुरे झाला।
आता विश्रांती घ्या, तुमच्या करुणामयी आईच्या मांडीवर।
कमख  पाकळ्यांच्या घरट्यांत, सुंदर फुलांच्या बहराने,
मी तुमच्या जीवनाला सजवेन।
आनंदमय सुगंधाने, तुमचे क्षणन् क्षण भरून काढीन।
तुमच्या मस्तकाला प्रेमाने माखेन, कारण,



तुमचे दु:ख मला आता पाहवत नाही।
आनंदाच्या सागरात मला, तुम्हाला डुंबवू दे,
म्हणजे तुमच्या हृदयकोषात हसणाऱ्या,
लपून छपून तुम्हाला सतत चिडविणाऱ्या,
त्या महान पुरुषाशी तुमचे अंतरंग एकरूप होईल।
जागे व्हा, म्हणजे तो तुम्हाला सापडेल,
तुमच्यातील प्रत्येक नस, आत्मिक आनंदाने चैतन्यमय करताना,
संपूर्ण विश्व प्रकाशमय करताना।



१९७४ साली श्रीमाताजींच्या पतींची आंतरराष्ट्रीय मेरीटाईम संघटनेचे महासचिव या पदावर बिनविरोध निवडणूक झाली. श्रीमाताजींनी लंडन येथे घर घेतले. त्यांना राजदूताच्या ऑफिशियल दौरे, स्वागत समारंभ वगैरेनी भरलेल्या कंटाळवाण्या जीवनाशी जुळवून घ्यावे लागले. ब्रिटिश लोकांचा अहंकार त्यांना समजेना. असे अनेक व्याप असतानाच

त्यांनी सतत हिप्पी लोकांना बरोबर घेऊन लंडन येथे सहजयोगाची सुरुवात केली आणि त्यांना वाचविण्यासाठी तीन वर्षे न कंटाळता परिश्रम घेतले. त्यांना जेवणासाठी पैसेही दिले.

त्यांच्या प्रयत्नांना हळू-हळू यश मिळाले, आणि विल्यम ब्लेक यांनी केलेली भविष्य वाणी प्रत्यक्षात उतरली. सहजयोगाच्या पहिल्या आश्रमाची लॅबेथ व्हेल या ठिकाणी स्थापना झाली. नवीन जेरुसलेमची घडण सुरू झाली. कोणतीही संघटना, सभासदत्व इत्यादी नसूनही सहजयोगाने मोठी प्रगती केली. प्रेमाचे पंख पसरून युरोप आणि ऑस्ट्रेलियापर्यंत भरारी मारली.



दरवर्षी काही महिने तरी भारतात येऊन श्रीमाताजी महाराष्ट्रातील खेड्यात कार्य करीत होत्या. परदेशात वास्तव्य असले तरी त्यांचे हृदय असंख्य भारतीयांच्या जवळ होते. पुढील १५ वर्षे त्यांचे बहुतेक कार्य खेड्यातच झाले.

काही वेळेस बैलगाडीने एका खेड्यापर्यंत जाऊन दुसऱ्या खेड्यापर्यंत पायी चालावे लागे. जमिनीवर अथवा कसेतरी तयार केलेल्या कॉटवर झोपायचे, जेवणास जे मिळेल ते, नदीत स्नान करणे, शरीरास त्रास झाला तरी त्याचे कधीच काही वाटले नाही. आत्म्यास आराम मिळाल्याचा त्यांना आनंद होत असे.

महाराष्ट्राच्या भूमीस संतांचे महान आशीर्वाद आहेत. लोक गरीब असले तरी त्यांच्याजवळ आत्म्याची श्रीमंती आहे. येथे चैतन्य लहरींना लगेच प्रतिसाद मिळतो.

राहुरीपासून पुण्यापर्यंत, खेडोपाडीच्या लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाला. दरवर्षी शेकडो पाश्चात्त्य सहजयोग्यांना ठिकठिकाणच्या चैतन्याचा आनंद मिळावा यासाठी श्रीमाताजी त्यांना महाराष्ट्राच्या दौऱ्यावर घेऊन जात. संध्याकाळी परत येत त्यावेळी आकाश चैतन्याच्या गुलाबी रंगाच्या प्रकाशाने भरलेले असे.

ऐंशी सालानंतर सहजयोग मोठ्या शहरात वाढू लागला. त्यावेळचे राष्ट्रपती श्री.संजीव रेड्डी यांचा हृदयाचा विकार श्रीमाताजींनी बरा केला, त्यांनी भारतातील पहिल्या आश्रमासाठी दिल्ली येथे जागा दिली. पॅरॅलिसीसने आजारी असलेले दिल्ली येथील एक डॉक्टर पूर्णपणे रोगमुक्त झाले. डेहराडून येथील एक आर्किटेक्ट रक्ताच्या कर्करोगाने मृत्यूच्या दाढेत होते. सहजयोगाने ते व्याधिमुक्त होऊन निरोगी झाले. मुंबई येथील एक सिव्हील इंजिनियर यकृताच्या विकारातून मुक्त झाले. लोकांच्या स्वानुभवातून सहजयोग भारतभर पसरला. प्रसार माध्यमातून विशेष प्रसिद्धी करण्यात आली नाही, त्यांच्यासाठी पैसेही नव्हते आणि वृत्तपत्रांनी सहजयोगासारख्या पवित्र गोष्टीसाठी एक चांगला शब्द कधी लिहिला नाही.



क्वाललंपूर येथे पाचशे लोक आपल्या विविध रोगाचे निवारणासाठी श्रीमाताजींकडे आले. श्रीमाताजींनी फक्त पृथ्वीमातेची मदत मागितली. प्रत्येकाला अनवाणी पायाने जमिनीवर उभे केले आणि जमिनीला चैतन्यमय

करून, त्यांची खराब व्हायब्रेशन्स ओढून घेण्याची भूमी मातेला प्रार्थना केली. पृथ्वीने विरोधी व्हायब्रेशन्स शोषून घेतली आणि सर्वांना आराम मिळाला, त्यांच्या हातांवर थंड चैतन्याची जाणीव झाली.

मुंबई येथे, नशा आणणाऱ्या पदार्थाच्या व्यसनाधीन झालेल्या मुलाला घेऊन एक पिता श्रीमाताजींकडे आला. श्रीमाताजींनी मुलाला आत्मसाक्षात्कार दिला. मुलाला रात्री शांत झोप लागली, नंतर पुन्हा केव्हाही मुलाने अमली पदार्थ घेतला नाही. एका मद्यपी माणसास त्याची हताश बायको घेऊन आली. एका रात्रीत त्या माणसाची दारू सुटली. एका अंधास दृष्टी मिळाली आणि बधीर व्यक्तीला ऐकू येऊ लागले. श्रीमाताजींच्या चमत्काराची माहिती जगभर पसरली आणि सहजयोगाने दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड, आफ्रिका, उत्तर अमेरिका तुर्कस्तान आणि पूर्वेकडील देशात मुळे धरली.

रशियामध्ये राष्ट्रपती गोर्बाचेव्ह यांच्या ग्लासनॉस्त व पेरेस्त्राइका धोरणामुळे १९८९ साली पोलादी पडदा दूर झाला. या धोरणाच्या अंतर्गत गोर्बाचेव्ह यांना रशियन जनतेचा अध्यात्माशी परिचय करून द्यायचा होता. त्यांनी रशियन राजदूतास भारतातील विविध अध्यात्मिक प्रणालींचा अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या. राजदूतांनी हृषिकेश व पुणे येथे प्रतिनिधी पाठवले. रजनीशला याचा सुगावा लागताच त्याने रशियन लोकांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान रशियन सरकारला रजनीश आश्रमातील ग्रुप सेक्सच्या कार्यक्रमाची बी.बी.सी. ने चित्रित केलेली एक फिल्म मिळाली आणि रजनीशचे प्रपोजल कोसळले. ऑगस्ट १९८९ मध्ये रशियन आरोग्य मंत्रालयाने सहजयोगातून त्यांच्या आरोग्य विषयक कार्यक्रमात सुधारणा करण्यास श्रीमाताजींना निमंत्रण दिले आणि रशियन आरोग्य मंत्रालय व श्रीमाताजींचा लाईफ इटर्नल ट्रस्ट यांच्यामध्ये रशियन वैद्यकीय उपचार व्यवस्थेमध्ये सहजयोग प्रस्थापित करण्यासंबंधी एक करार (प्रोटोकॉल) झाला.



PROTOCOL

of intent between the Ministry of Health USSR and the Life Eternal Trust International to cooperate in the field of Research of Sahaja Yoga method in the USSR

Moscow August 9, 1989.

Meeting between Mr. V.I.Ilyin, representative of Main administration for science and medical technologies of the USSR Ministry of Health and Mrs. Sri Mataji Nirmala Devi, Mr. Yogeshwar Mahajan, Mr. Brian Wells, Mr. Bogdon Shilowych, representatives of the Life Eternal Trust International has been held in the USSR Ministry of Health on August 4, 1989. Both sides have drawn up mutual opinion on the problem.

1. Sahaja Yoga techniques proposed by the representatives of the Life Eternal Trust International are based on ancient traditions of oriental (indian) medicine. Those methods may be of great interest for different specialists in the field of medicine.

Broad application of Sahaja Yoga methods in the USSR requires profound scientific investigations and clinical trials.

2. The participants believe it's possible to define specific forms for cooperation during 1989.

V.I.Ilyin
Main Administration
for science and medical
technologies
Ministry of Health
USSR

Yogeshwar Mahajan
Life Eternal Trust
International

रशियन सरकारने दि लाईफ इटर्नल ट्रस्टचे बरोबर केलेला करार

पुढील चार वर्षात मोठ्या प्रमाणावर सहजयोग रशियात पसरला. मॉस्को, सेंट पिटसबर्ग ताग्लीयाटी व कीव्ह या केवळ महानगरात एक लाखाचे वर सहजयोगी आहेत. श्रीमाताजींचे कार्यक्रम मोठ्या स्टेडियममध्ये आयोजित केले असूनही बसण्यास जागा कमी पडली इतके लोक उपस्थित होते.

सोव्हिएट युनियनचा भंग झाल्यावर सर्व नवीन देशांमध्ये प्रचंड आर्थिक संकटे उद्‌भवली, कारखाने बंद पडले, अन्न व इतर गरजांच्या वस्तूंची प्रचंड टंचाई निर्माण झाली. पाश्चात्त्य देशांच्या योजना अद्याप अनिश्चित होत्या. श्रीमाताजी

त्यांच्याबद्दल फारच काळजीत होत्या. मॉस्को येथे दि.१४ नोव्हेंबर १९९३ रोजी पूजेत श्रीमाताजींनी त्यांना महालक्ष्मीतत्त्वाचे आशीर्वाद दिले. श्रीमाताजींनी आपल्या अडचणींच्या काळात आपल्याला एकटे सोडले नाही, तर अतिशय कडाक्याच्या थंडीत त्या आपल्यासाठी आपल्या प्रार्थनांना प्रतिसाद देऊन आल्या, याचा रशियन लोकांना फारच आनंद झाला, त्यांनी मेडोना (श्रीमहालक्ष्मी-मेरी माता) यांच्या स्वरूपात श्रीमाताजींची पूजा केली. ते म्हणाले, 'आई, आम्ही इतकी वर्षे तुझी वाट पहात होतो, एका जुन्या भविष्य कथनावरून आम्हाला हे माहिती होते की रशिया माता पूर्वेकडील देशातून आम्हाला वाचविण्यास येणार आहे.'

मॉस्को येथील वैद्यकीय परिषदेत ६०० डॉक्टर उपस्थित होते. श्रीमाताजींनी भाषणास सुरुवात करताच त्यांनी आत्मासाक्षात्कार देण्याची विनंती केली. रशियन राजदूताने श्रीमाताजींचा सत्कार करून फार महत्त्वाच्या प्रसंगी रशियाला मदत केल्याबद्दल श्रीमाताजींना धन्यवाद दिले.



दि.१२ नोव्हेंबर १९९३ रोजी सेंट पिट्सबर्ग येथील पेट्रोव्हस्की ॲकॅडमी ऑफ सायन्स अँड आर्टस् या संस्थेने श्रीमाताजींना सन्माननीय सदस्यत्व प्रदान केले. या ॲकॅडमीने या पूर्वी अशी पदवी अल्बर्ट आइनस्टाईनला दिली होती. परंतु संस्थेच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणात उद्गार काढले, की आईनस्टाईन

यांनी जड पदार्थांवर काम केले पण श्रीमाताजींचे कार्य त्यांच्यापेक्षाही महान आहे कारण त्यांच्या कार्याने मानवाला शांतीचा लाभ करून दिला आहे. दि.१४ सप्टेंबर १९९४ रोजी ॲकॅडमीने सहजयोगाबरोबर विज्ञान परिषद आयोजित केली. विज्ञानाच्या क्षेत्रात ही महान घटना होती. प्रसिद्ध शास्त्रज्ञांनी, सहजयोग श्रेष्ठ विज्ञान आहे अशी कबुली दिली आणि जाहीर केले की विज्ञान अद्याप सहजयोगाच्या पातळीपर्यंत प्रगत झाले नाही.

रशियानंतर रूमानिया, पोलंड, हंगेरी आणि झेकोस्लोव्हाकिया या देशात सहजयोग पसरला. १९९३ सालामध्ये आयातुल्ला मेहदी रूहानी नावाच्या शिया मुस्लिमांच्या जागतिक नेत्याला आत्मसाक्षात्कार मिळाला. त्यांनी श्रीमाताजी परमेश्वराचा अवतार आहेत हे ओळखले. १९९४ साली फ्रांस देशात सहजयोगास धर्म म्हणून सरकारी मान्यता मिळाली.

१९९४ साली ब्राझिलिया येथे श्रीमाताजींच्या स्वागतास त्या शहराचे महापौर विमानतळावर उपस्थित होते. त्यांनी आपल्या शहराच्या किल्ल्या श्रीमाताजींना भेट दिल्या. महापौरांना धन्यवाद देऊन श्रीमाताजींनी किल्ल्या आपल्या हृदयाशी धरल्या व म्हणाल्या, 'धन्यवाद, त्यांना मी माझ्या हृदयात ठेवेन.'

सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये भाषण करताना श्रीमाताजी साधकांच्या अध्यात्मिक प्रगतीच्या आड येणाऱ्या रूढी व परंपरांच्यावर स्पष्टपणे टीका करतात. त्या म्हणतात, 'मी तुमची मते मागण्यासाठी नाही, तर तुम्हाला सत्य सांगण्यासाठी आले आहे. सहजयोगी त्यांच्या सुरक्षेबद्दल चिंता व्यक्त करतात. तेव्हा श्रीमाताजी हसून आश्वासन देतात, जगातील सर्व द्वेषाहून प्रेम अधिक शक्तिशाली आहे. काळजी करू नका. या जीवन काळात कोणी क्रूसावर चढविणार नाही. यावेळी निराळे नाटक होणार आहे. वाईट लोक माझ्यासमोर कसे कापतात ते तुम्ही पाहिले नाही का?'

श्रीमाताजींच्या स्वभावातील अनपेक्षित पण सर्वात आनंददायी पैलू म्हणजे त्यांना मिळालेली विनोदी स्वभावाची दैवी देणगी. सार्वजनिक कार्यक्रमानंतर त्यांच्या सभोवताली सहजयोगी मंडळी जमिनीवर तासन तास बसून त्यांच्या हास्य विनोदाच्या आनंदात रममाण होतात. अगदी क्षुल्लक प्रसंगसुद्धा एका सुज्ञतेच्या कथेत वा सुंदर कवितेत परिणित होतो व सहजच, हसत, खेळत, हृदयाचा एखादा लहान पण मौल्यवान कप्पा उघडतो. आज सहजयोगाची साधना पासष्ठ देशांत होत आहे.

# १० : श्री गगनगिरी महाराजांची भेट

एक दिवस श्रीमाताजींनी महान संत श्री गगनगिरी महाराज यांच्या उंच टेकडीवरील घरी जाण्याची इच्छा व्यक्त केली. या महाराजांचा निसर्गावर अधिकार असल्याची ख्याती होती.

'श्रीमाताजी, केवळ या माणसाला भेटण्यासाठी आपण इतकी उंच टेकडी चढणार?' सहजयोग्यांनी विचारले. 'त्यांची व्हायब्रेशन्स (चैतन्य लहरी) बघा.' श्रीमाताजींनी सांगितले. टेकडीच्या माथ्यावरून येणाऱ्या थंड चैतन्य लहरींनी सहजयोग्यांना दर्शविले, की ही कोणीतरी साक्षात्कारी व्यक्ती आहे. श्रीमाताजींनी टेकडी चढण्यास सुरुवात केली आणि मुसळधार पावसास सुरुवात झाली. श्रीमाताजी पावसात पूर्ण भिजल्या.

दूरवरून या गुरूंची आकृती दिसत होती. ते काही करून पाऊस थांबावा म्हणून शर्थीचे प्रयत्न करीत होते. देवीने घरात प्रवेश केला, तेव्हा ते म्हणाले, ' हा निर्लज्ज पाऊस नेहमी माझ्या आज्ञेत असतो, पण आज मला थांबवता आला नाही. श्रीमाताजी तुम्ही माझ्या शक्ती का काढून घेतल्या?' श्रीमाताजी हसून म्हणाल्या, 'तुम्ही माझ्यासाठी साडी घेऊन ठेवली आहे ती मला कशी घेता आली असती?' त्या प्रेमाने संत विरघळून गेले. त्यांच्या लक्षात आले की देवीच्या साडीतून ओघळणारे पाणी व्हायब्रेटेड असून त्यांच्यामुळे आपले घर चैतन्यमय होत आहे. संतांचा सन्मान करण्याच्या श्रीमाताजींच्या निराळ्याच पद्धती आहेत.

एकदा एका गरीब स्त्रीच्या पडक्या झोपडीत तिने घाणेरड्या भांड्यात दिलेले थोडेसे जेवणही त्या आनंदाने जेवल्या. काही वेळाने सहजयोग्यांनी विचारले की, 'या भिकारणीसाठी आपला इतका वेळ का दिला?' त्यांनी उत्तर दिले, 'बाळांनो, तिच्याबद्दल असे बोलू नका. ती माझ्या सर्वांत आवडत्या मुलांपैकी एकाची विधवा पत्नी आहे.' सहजयोग्यांना नंतर त्या खेड्यातील लोकांकडून समजले,

की त्या बाईचा मृत नवरा देवी भक्त होता.

आणखी एका प्रसंगी एका संताच्या गुहेमध्ये जाऊन जमिनीवरच श्रीमाताजी बसल्या. बरोबरच्या सहजयोग्यांनी विचारल्यावर त्या हसून म्हणाल्या, ‘मी जमिनीवर का बसू नको, मी तर राजाच्या राजवाड्यात आहे.’

## ११ : जन्मजात वास्तुशिल्पज्ञ

श्रीमाताजींनी केव्हाही आर्किटेक्चरचा अभ्यास केला नाही. पण त्या महान आर्किटेक्ट आहेत. त्यांनी स्वत: दोन सर्वात सुंदर वास्तूंचे आणि जगभरच्या सहजयोगाच्या आश्रमांचे प्लॅन बनविले आहेत. पुण्यातील त्यांचे प्रतिष्ठान नामक घर म्हणजे आर्किटेक्टचे स्वप्न आहे.

दिल्लीजवळ नॉयडा येथील त्यांचे दुसरे घर नितांत सुंदर आहे. मुंबईतील कोकण भवन जवळील पारंपारिक आंगण असलेल्या विस्तीर्ण आश्रमाचे डिझाईन आणि दिल्ली येथील आश्रमाचे डिझाईन श्रीमाताजींनीच तयार केले आहे. तसेच धर्मशाला येथील हिमाचल पद्धतीचे गडकोट किल्ल्याप्रमाणे दिसणारे शाळेचे डिझाईनही त्यांनीच केले आहे.

चैतन्य लहरी प्रवाहित होणे सोयीचे व्हावे यासाठी त्यांनी इमारतीच्या रेषांमध्ये प्रवाहितपणा आणला. जड पदार्थांमध्येसुद्धा चैतन्य असते. वास्तूंचे डिझाईन असे असावे की, त्यात चैतन्य लहरी वाढून राहणाऱ्यांना शांती मिळावी. वास्तूवरून आर्किटेक्टची व्हायब्रेशन्स समजतात.



एका प्रसंगी एक शिष्य भारतातील राजवाड्यांवरील एक पुस्तक श्रीमाताजींना दाखवित असता त्यांनी त्या शिष्यास प्रत्येक पॅलेसची व्हायब्रेशन्स पहाण्यास सांगितली. जेव्हा बडोदा येथील जुन्या किल्ल्याची व्हायब्रेशन्स त्यांनी पाहिली तेव्हा लगेच त्यास थंड जाणवले. श्रीमाताजींनी सांगितले, की त्या वास्तूचे आर्किटेक्ट साक्षात्कारी जीव असल्याने थंडपणा जाणवला.



समतोल व प्रमाण, सर्वात महत्त्वाचे. लहान मुलाला पर्फेक्ट प्रमाणात आकार द्यावा त्याप्रमाणे वास्तूची संकल्पना तयार होते. श्रीमाताजींच्या दृष्टीने ती जीवित क्रिया आहे. 'खांब टोकापेक्षा पायथ्याशी अधिक मोठा हवा, प्रवेशद्वारे रूंद व राजेशाही असावीत. बेडरुमच्या दरवाज्याने टॉयलेट सीटची प्रायव्हसी बिघडू नये.' वास्तूच्या प्रत्येक जोडणीत, त्यांची डिसेन्सी व योग्यायोग्यतेची दृष्टी व्यक्त होते.

पण हवामानाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे यासाठी खुली जागा भरपूर सोडली जाते, छताची उंची जास्त ठेवायची. घर थंड रहावे म्हणून सभोवताली व्हरांडा, प्रखर उन्हाचा घरात त्रास होऊ नये या हेतूने लॅटीन पद्धतीच्या खिडक्या ठेवल्या जातात. बाहेरची थंड हवा आत येऊन आतील उष्ण हवा बाहेर जावी व नैसर्गिकरीत्या थंडावा रहावा यासाठी बेडरूमच्या दक्षिण दिशेकडे उघडणाऱ्या

असतात, ज्या बाजूने वारा येतो.

श्रीमाताजींची अर्थशास्त्रीय दृष्टी त्या विषयातील तज्ज्ञालाही लाजवेल अशी आहे, ज्या गोष्टीची खरेदी करायची, ती ज्या ठिकाणी तयार होते तिथे श्रीमाताजी स्वत: जातात व स्वस्त दरात खरेदी होते. लाकूड विकत घ्यायचे असल्यास जंगलातून विकत घ्यायचे. असे म्हणतात, की लखनौ येथे त्यांनी बांधलेले पहिले घर इतके प्रचंड मोठे झाले, की सरकारी वर्तुळात भुवया उंचावल्या गेल्या, 'आपल्या पतीच्या थोड्या उत्पन्नातून एवढे मोठे १२ बेडरुमचे घर त्या कशा बांधू शकल्या.' नंतर समजले की संपूर्ण वीट भट्टीच त्यांनी विकत घेतली व शिल्लक राहिलेल्या वीटा मोठा नफा घेऊन विकल्या. तसेच वाळूचे खरेदीसाठी नदी किनारा लिजवर घेतला व शिल्लक राहिलेली वाळू नफा घेऊन विकली. त्याचप्रमाणे शंभराचे वर दरवाजे तयार केल्यावर शिल्लक राहिलेल्या लाकडाची विक्री करून वापरलेल्या लाकडाची किंमत भरून काढली. सुदैव सावलीप्रमाणे त्यांच्या मागे असते. अगदी थोड्यातून त्या विपुलता आणतात. ज्या उंबरठ्याच्या आत त्या पाऊल ठेवतात ते घर आशीर्वादित होते.

लखनौच्या घराचे काम होत असताना एक दिवस पन्नास कामगारांसाठी



त्यांनी जेवण बनविण्याचे ठरविले. ऐन वेळी कामगार त्यांच्या नातेवाईकांना घेऊन आले. दोनशेच्या वर माणसे जेवूनही भरपूर अन्न शिल्लक राहिले होते. थोड्याशा स्वयंपाकात अनेक जण जेवल्याचे चमत्कार त्यांचे बाबतीत नेहमीच घडतात. सहजयोग्यांना नंतर समजले, की देवी अन्नपूर्णा स्वरूपात त्यांची प्रार्थना केल्यास अन्न आशीर्वादित होऊन कमी पडत नाही.

लखनौच्या घराचे डिझाईन त्यांनी जहाजाप्रमाणे बनविले. कदाचित त्यांच्या पतीच्या शिपिंग व्यवसायातील यशस्वी कारकीर्दीची ती नांदी असावी. हे सर्व त्यांनी एकटीनेच पार पाडले. त्यांचे पती त्यावेळी शहर दंडाधिकारी असल्याने फार बिझी असायचे. तरीसुद्धा त्या आनंदाने टांग्याने अथवा रिक्षाने जात असत.

१९५० सालानंतरचा काळ टंचाईचा होता. देशाचे नुकतेच विभाजन झाले होते व त्यांच्यातून लोक स्वतः अद्याप सावरत होते. सिमेंटच्या टंचाईमुळे लखनौ येथील घराच्या कामात अडचण आली. त्यांचे पती स्वतःच्या उच्च पदाचा फायदा घेण्यास अनुमती देत नव्हते. सर्व सामान्यांना येणारे त्रास श्रीमाताजींनीसुद्धा समाधानाने सहन केले. लखनौमधील निराला नगर या भागातील हे घर नंतर त्यांच्या मुलीला बक्षीस दिले. कालांतराने तिने ते विकले.

श्रीमाताजींना पारंपारिक राजपूत पद्धतीचे आर्किटेक्चर आवडते. पण इतर पद्धतीचाही त्या समावेश करतात. त्यांची सृजनशीलता अमर्यादित आहे. त्यांनी जग इतके पाहिले आहे, की त्यांच्या पद्धतीमध्ये सृजनशीलता उत्स्फूर्तपणे येऊन वैविध्य व देदीप्यमानता फुलून येतात. उदाहरण द्यायचेच तर प्रतिष्ठानच्या दर्शनी भागावर पारंपारिक राजस्थानी दगडी कमानी व लॅटीस काम दिसून येते, पण पार्श्वभाग स्पॅनिश व पोर्तुगिज पद्धतीचा वाटतो. दोन्ही तितक्याच देखण्या असून पार्श्वभाग कोणता हे सांगता येत नाही.

त्यांच्या ओरिजनल कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यास दोन वर्षे न कंटाळता त्यांनी कारागिरांना शिक्षण दिले. शंभरपेक्षा अधिक संख्येने कुशल कारागिर व



अकुशल कामगार काम करीत असूनही त्या केव्हाही रागविल्या नाहीत वा कोणाशी आवाज चढवून बोलल्या नाहीत. चुकीची दुरुस्ती इतक्या प्रेमाने केली जाई, की तसे लक्षातसुद्धा येत नसे. प्रत्येक जण त्या प्रसन्न व्हाव्यात म्हणून तत्पर असे. जणू काही त्या मिष्टान्नाचे जेवण तयार करीत होत्या व इतर लोक त्या आनंदात रममाण होते. सर्वसाधारण लोक व सहजयोगी यांना सुद्धा कुशलता यावी यासाठी त्या काम करण्याची परवानगी देत असत आणि परफेक्शन मिळविण्यास प्रोत्साहन देत. कामगारांच्या त्या मालकीण नसून आई होत्या. त्यांची दुःखे कमी करायची, आजारपणे बरी करायची, त्यांच्या मुलांना कपडे आणायचे, कसबी कारागिरांना त्या फार आदराने वागवायच्या, त्यांच्या कामाची स्तुती करायच्या व त्यांना वस्तू भेट द्यायच्या. कामगारांचेही श्रीमाताजींवर फार प्रेम होते. सुट्टीच्या दिवशी ते लोक श्रीमाताजींची स्तुतीपर भजने म्हणायचे. हितकारक हा मालक-कामगार संबंधाचा पाया कसा असू शकतो याचे त्यांनी उदाहरण घालून दिले. व्यावसायिक हा त्यांच्याकडे काम करणाऱ्या कामगारांच्या पित्याप्रमाणे असून तो सर्वांना आपल्या संरक्षणाच्या छत्र छायेखाली ठेवतो. मुंबईचे उद्योगपती श्री.राजेश शहा यांनी श्रीमाताजींच्या उपदेशांस मान्यता देऊन तो अमलात आणल्याने त्यांचा कारखाना बेदरकार युनियनच्या कचाट्यातून वाचविता आला.

प्रस्थापित पद्धतीमध्ये सुधारणा करून सहजरीत्या नवीन तंत्र त्या विकसित करायच्या. त्यांनी शोधलेल्या नवीन पद्धतीने लाकूड, प्लास्टर इत्यादी पदार्थ दगडाप्रमाणे दिसायचे. त्या समजवितात की कला ही आरामदायी असू शकते. शांतिमय कलाकृती विचारांना चालना देत नाही. निर्विचारितेत आपण शांत होतो. शांततेमध्ये आंतरिक प्रगती होते आणि सहज ध्यान होते. कन्फ्युशियस व लाओत्से यांनी प्रभावित केलेली चिनी कला गहनतेचा अनुभव देते.

श्रीमाताजींना नैसर्गिक सामुग्री आवडते, संगमरवर व्हायब्रेशन्स करिता चांगला असतो, म्हणून संगमरवरी दगडाची स्वत: निवड करण्यास अठरा तास मोटारीने राजस्थान भागात प्रवास करून मकराना येथील संगमरवरी दगडांच्या खाणी पहाण्यास त्या गेल्या. संगमरवरी दगड घरातील जमिनीवर बसविताना त्यांनी स्वत: देखरेख करून प्रत्येक रेषा जुळते आहे याची खात्री केली व कलात्मकता आणली. हे पहात असताना देवीने सृष्टी रचनेत सौंदर्य कसे आणले असेल याची कल्पना आली. त्यांना वैविध्य आवडते आणि त्याचेसाठी त्या विविध मटेरियल्सचा, दगडाचा, स्लेटसचा, रंगांचा व उपकरणांचा उपयोग करतात. त्यांच्या हाताखाली पाच आर्किटेक्टस प्रतिष्ठान येथे काम करीत होते, पण श्रीमाताजींच्या असीम शक्तीच्या तुलनेत ते कमीच वाटत होते.

प्रतिष्ठानच्या जमिनीच्या बऱ्याच लेव्हल्स असल्याने आर्किटेक्टसनी सर्व प्लिंथ शून्य पातळीवर आणायचे योजिले होते. श्रीमाताजींच्या हे लक्षात येण्यास वेळ लागला नाही, की असे करण्यात बऱ्याच मोठ्या साहित्याचा अपव्यय होणार होता. म्हणून त्यांनी एका रात्रीत संपूर्ण प्लॅन बदलून जमिनीच्या विविध लेव्हल्सचा फायदा घेऊन घर अधिक आकर्षक करणारा प्लॅन तयार केला.

एखाद्या गैरसोईचे फायद्यामध्ये परिवर्तन कसे करायचे हे त्यांनी आर्किटेक्टसना शिकविले, मग प्रत्येक अडचणीच्या प्रसंगात हे मार्गदर्शन उपयोगी पडले. शेवटी आर्किटेक्टसनी ओळखले की श्रीमाताजी सर्वांच्या आर्किटेक्ट आहेत आणि ते श्रीमाताजींना शरण गेले. त्यांनी मान्य केले, की त्यांचे खरे

प्रशिक्षण श्रीमाताजींच्या हाताखाली सुरू झाले. दहा वर्षे झाली आता या आर्किटेक्टसना प्रसिद्धी आणि श्रीमंती मिळाली आहे. त्यांच्या यशाचे श्रेय ते श्रीमाताजींच्या आशीर्वादाला देतात.



श्रीमाताजी नवीन कल्पनेचा विचार करण्यास नेहमीच तयार असतात. पण मूल्यांच्या बाबतीत केव्हाही त्यांना तडजोड मान्य नसते. त्यांच्या अनुपस्थितीत घराचा मुख्य जिना आर्किटेक्टसनी एखाद्या बोगद्याप्रमाणे बनविला होता, घराला न शोभणारा. परतल्यावर श्रीमाताजींनी तो सर्व जिना तोडावयास लावला. आर्किटेक्टसना मोठे आश्चर्य वाटले, पण त्या जिन्याऐवजी श्रीमाताजींनी गुलाबी संगमरवरी दगडात इतका उत्तम जिना बांधून घेतला की तो प्रतिष्ठानचे भूषण आहे.

त्यांचे मन इतके सृजनशील व कल्पनांनी भरलेले आहे, की ते काळाच्या पुढे असते आणि त्यांच्या बरोबरीस येणे अशक्य असते. त्यांचे चित्त लेसर किरणांप्रमाणे जिथे जाईल तिथे आतपर्यंत प्रवेश करते. क्षणभर जरी ते एखाद्या गोष्टीकडे केले तरी ती वस्तू चित्तात बसते.

एकदा श्रीरामपूरहून पुण्यास येतांना एका टेकडीवरील सफेद रंगाच्या दगडांनी त्यांचे लक्ष वेधले. पुण्यास परतल्यावर त्यांनी ते दगड वॅगनभर मागविले. त्याचा उपयोग प्रतिष्ठानच्या बाहेरील बाजू मजबूत करण्यासाठी झाला.

त्यांच्या वास्तूच्या सजावटीसाठी केलेले नक्षीकाम सृजनशीलतेच्या सर्वोच्च

स्थितीमध्ये उन्नत होत जाते. श्रीमाताजी सांगतात, की आत्म्याला होणारा आनंद सृजनशीलतेत व्यक्त होतो. पाश्चिमात्य मन इतके कार्यमग्न असते, की ते थकलेले असते आणि त्याला कलात्मक सृजनशीलता सुचत नाही व त्यांच्यामुळे पांढऱ्या व ग्रे रंगाच्या रिकाम्या भिंती तयार होतात.

श्रीमाताजी कदाचित जगातील सर्वाधिक प्रवास केलेल्या व्यक्ती असाव्यात व तेवढे त्यांनी पाहिले आहे. त्यांच्या प्रचंड सृजनशक्तीला व कल्पकतेला त्या सर्वांची जोड मिळून वास्तुशिल्पातील एका नवीन व विशेष प्रणालीची निर्मिती होते. श्रीमाताजींसाठी वास्तुशिल्प म्हणजे जणू काही विश्वाला नानाविध रंगांनी, रूपांनी व सृष्टीच्या अखंड घटना विघटनांनी, नटविणे होय. जणू काही अंतरीच्या प्रेम, करुणा, आनंद, तेजस्विता, राजेपणा, अश्रू, तळमळ, वात्सल्य, संकोच, विजय, हास्य व नेहमी दिसून येणारा, खेळकरपणा, इ.प्रकार भावनांना आरशाप्रमाणे प्रतिबिंबित करणारा चेहराच! शिवाय आवश्यकतेनुसार शिष्यांच्या हितासाठी त्या रौद्र स्वरूपसुद्धा धारण करू शकतात. निसर्गासारखे त्यांचे मूड सुद्धा बदलू शकतात. कधी हिमालयाच्या बर्फाच्छादित उत्तुंग शिखरांप्रमाणे शांत,



तर कधी गंगेच्या खळाळणाऱ्या पाण्यासारखा जगातील सर्वांना पवित्र करणारा, दु:खाचे निराकरण करणारा, तर काही वेळेस अंतरीच्या सागराप्रमाणे असलेल्या गहनतेची जाणीव देणारा. त्या चिरंतन साक्षी आहेत. स्वत:च्या लीला नाट्याच्या साक्षी आहेत. कला, शिल्प, सजावट इत्यादी रूपांनी लीला नाट्याचा आनंद त्या स्वत:ही घेतात व

जनसामान्यांसाठी निरंतर आनंदाबरोबरच सृजनशीलता, कल्पकता व प्रेरणा यांचे स्रोत त्या निर्माण करतात.

उठाव यावा म्हणून काही ठिकाणी रंग घातले जातात तर काही जागांचा उठाव कमी दिसावा यासाठी रंगाचा गडदपणा कमी केला जातो; गतिमानता येण्यासाठी वळण दिले जाते तर समतोल साधण्यासाठी रेषा ओढली जाते. त्यांच्या सृजनशीलतेमधून सर्वोत्कृष्ट कलेची व सद्‌गुणांची निर्मिती होते, मग त्या निर्मितीला सजविले जाते. एखादा सद्‌गुण प्रकाशित झाल्यावर तो विस्तारित होतो व विरोधी तत्त्वांच्या काट्यावर मात करतो. परमेश्वराने मानवाच्या रूपाने जणू स्वत:चेच चित्र काढले आहे. त्या चित्राला प्रकाशित करायला पाहिजे, त्याची सजावट करायला हवी, हे श्रीमाताजींचे कार्य आहे व त्या कार्यात अपेक्षेहून अधिक त्या यशस्वी झाल्या आहेत.

प्रतिष्ठान म्हणजे जणू काही कलाकारांचे नंदनवन असावे इतके त्यांच्या सजावटीत कोरीव काम आहे. मूर्ती, म्युरल्स, लॅटीस काम इत्यादी आहेत. विविध रंगाच्या काचा बसविलेली कारंजी आहेत व बगीचेही आहेत. प्रत्येक दरवाज्यावर नक्षीकाम आहे व प्रत्येक खोली श्रीमाताजींनी स्वत: लक्ष घालून तयार करून घेतली आहे. प्रत्येक ठिकाणी विविध कलाकृतींचा व पद्धतीचा संगम



आहे. एकाच पद्धतीस प्राधान्य देणाऱ्या पाश्चात्त्य संकल्पनेशी ते जुळणारे नाही. राजपूत राजप्रासादांपासून ते अगदी लोककलेपर्यंत अथवा व्हिक्टोरिन पद्धती पासून ते पौर्वात्य पद्धतीपर्यंत विविध कलाप्रणाली व मूड्स दिसून येतात. कोणत्याही कोपऱ्यात अंधार दिसत नाही. त्यांची लीला आश्चर्यकारक आहे. प्रत्येक खोली ही पहात रहावी अशी आहे. आपली दृष्टी जाईल त्या ठिकाणी आईच्या प्रेमाने हृदयात आनंदाच्या उर्मी उठतात. त्यांच्या वास्तूच्या रूपाने त्यांनी विश्वाला एक नवीन हृदय बहाल केले आहे. त्या स्वत: अगदी अनौपचारिक असून, म्हणतात की, 'घर एखाद्या हॉस्पिटलप्रमाणे नसावे.'

त्या कोणत्याच बाबतीत जास्त आग्रही नसतात. त्यांची नातवंडे अथवा भेटीस येणारे लोक मुक्तपणे पर्शियन गालिचे व अँटिक फर्निचरचा उपयोग करतात.

एखाद्या व्यक्तीने फुलदाणीचे व नक्षीकाम केलेल्या हस्तीदंती वस्तूचे कौतुक केले, की ती व्यक्ती नको म्हणत असतानाही आग्रहाने ती वस्तू त्याला भेट दिली जाते. त्यांच्या असीम औदार्याची जाणीव शिष्यवर्गाला असल्याने ती मंडळी वस्तूंचे अधिक कौतुक केव्हाच करीत नाहीत. केल्यास श्रीमाताजी वस्तू त्या व्यक्तीला भेट देऊन टाकतात. त्या सौंदर्यांचा आनंद घेत असतात, पण त्यांना



आसक्ती नाही. प्रेमात सहभागी करून घेण्यास त्या अधिक महत्त्व देतात आणि सहजरीत्या एखादी दुर्लभ वस्तूसुद्धा प्रेझेंट देतात. एकदा सहजयोगाच्या विवाह सोहळ्यात एका मुलीला दागिने नव्हते. श्रीमाताजींनी स्वत:च्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून तिला दिल्या. ती मुलगी बांगड्या परत करण्यास गेली तेव्हा ती ही घटना विसरल्यासुद्धा होत्या आणि बांगड्या स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला. उजव्या हाताने काय दिले ते डाव्या हातास समजत नाही. एकदा हिशेब करीत असता लक्षात आले की प्रतिष्ठानवर खर्चिलेल्या पैकी एक चतुर्थांश रक्कम काम करणाऱ्या लोकांना दिलेल्या भेट वस्तूंवर खर्च झाली होती, कामगारांना घड्याळे, गवंड्यांना टेपरेकॉर्डर्स, आर्किटेक्टसना वहाने वगैरे.

देणग्या देण्यात त्या अतिशय उदार असल्या तरी त्यांना दिलेल्या भेटवस्तूचा स्वीकार करण्यास मात्र त्यांची तयारी नसते. त्यांच्याकडे अतिशय सुंदर कलाकृतींचा संग्रह असला तरी भेटीदाखल दिलेल्या सर्वात लहान वस्तूही, देणाऱ्याच्या प्रेमाचा पूर्ण आदर करून मौल्यवान खजिन्याप्रमाणे काळजीपूर्वक सांभाळली जाते व हृदयापासून त्या वस्तूचे कौतुक केले जाते. त्या वस्तूचे केव्हाही विस्मरण होत नाही. आलेल्या पाहुण्यास दाखविण्याचा प्रसंग आल्यास भेट देणाऱ्या व्यक्तीचे नाव व किती वर्षापूर्वी ती भेट वस्तू मिळाली वगैरे तपशीलवार सांगितले जाते.

स्वत:ला आराम मिळतो की नाही याची त्या काळजी करत नाहीत. प्रतिष्ठानचे काम चालू होते त्यावेळी लहान फ्लॅटमध्ये रहावे लागे. सकाळी कामाचे साईटवर त्या जायच्या. दिवसभर त्याच ठिकाणी रहायचे, डब्यांत बरोबर नेलेले जेवण जेवायचे व एका कॉटवर, थोडा वेळ विश्रांती घ्यायची. मग पुन्हा प्रारंभ. काही वेळेस असे वाटते, की त्यांचे शरीराकडे लक्षच नाही. त्या खाणेही विसरतात. त्यांनी काही तरी खावे अशी प्रार्थना बऱ्याच वेळा केल्यावर मग त्या खातात. खाण्यास काय आहे याची सुद्धा फारशी पर्वा नसते, पण कोणी पाहुणे आमंत्रित केले असल्यास मोठ्या मेजवानीचे आयोजन केले जाते.

योगीजनांसाठी स्वयंपाक करण्यास त्यांना आवडते. रेसीपीजवरील पुस्तकही त्यांनी लिहिले आहे. त्यांचे जावई आपल्या सासूबाईंनी बनविलेल्या चिकन बिर्याणीच्या वा खिम्याच्या आठवणी आवडीने सांगतात. त्यांच्या हातची मिष्टान्ने त्यांच्या पतीचे सर्वात आवडते पदार्थ आहेत.



**योगीजनांसाठी स्वयंपाक करणे त्यांना आवडत असे.**

श्रीमाताजी म्हणतात, की एखाद्या व्यक्तीवर तुमचे प्रेम असले, की त्यांना काय आवडते ते तुम्हास समजते व ते बनविणे तुम्हाला आवडते. म्हणूनच न थकता आपल्या मुलांसाठी त्या घरे बांधतात. आपण काही करतो आहोत असे त्यांना वाटतच नाही.

ऑस्ट्रेलिया वा इतर दूरवरच्या देशांचे तुफानी दौरे उरकून परत आल्यावरसुद्धा तेवढीच शक्ती त्यांना असते. चेहऱ्यावर हास्य विलसत असलेल्या त्या म्हणतात, 'लोक म्हणतात मी इतका प्रवास करते. परंतु मी फक्त तिथे बसलेली असते. मी प्रवास करत आहे असे मी मनात आणत नाही. मी जशी येथे

बसलेली आहे तशीच तेथे बसते. मी कोठेही बसू शकते. फक्त विचार करायचा नाही आणि निर्विचारितेत रहायचे. असे अनेक दौरे उरकून मुंबईला व पुण्याला येऊन २० हजार चौरस फुटांचे बांधकाम असलेला पॅलेस त्यांनी वयाच्या ६८ व्या वर्षी बांधून पूर्ण केला.' प्रतिष्ठान हे सध्याच्या पैठण ह्या गावाचे प्राचीन नाव आहे व श्रीमाताजींचे पूर्वज शालीवाहन राजांच्या राजधानीचे शहर होते. त्या प्रतिष्ठान शहराचे वर्णन एका जुन्या कवितेमध्ये खालीलप्रमाणे केलेले आहे.

'प्रतिष्ठान शहर म्हणजे महाराष्ट्राचा मुकुटमणी आहे. दृष्टीस सुख व आनंद देणाऱ्या राजवाड्यांनी आणि चैत्य इत्यादिनी त्यांचे सौंदर्य वाढविले आहे. या शहरात ६० पूजा करण्याची स्थाने असून या शहराच्या वेशीच्या आत पन्नास शूर वीरांनी जन्म घेतला होता.' म्हणून या शहरास 'वीरांचे शहर' असे म्हणतात.

वरील वर्णन प्रतिष्ठानासही तंतोतंत लागू पडते. याच प्रतिष्ठानच्या पायातून ईश्वरी शक्तीचे नवीन विश्व उदयास येईल.

# १२ : कायद्याची लढाई

१९८६ या वर्षात श्रीमाताजींनी आपले वास्तव्य भारतात करायचे निश्चित केले. त्यांच्या पतीची सुद्धा आय.एम.ओ.मधून लवकर सेवानिवृत्ती घेण्याची इच्छा होती. म्हणून श्रीमाताजींनी आपले शिष्य श्री.आर.डी.मगदूम, सिव्हील इंजिनियर यांना खालील पत्र लिहिले व शेतजमीन खरेदी करण्याची सूचना केली.

श्रीमती निर्मलादेवी<br>
४८, ब्रॉम्पटन स्क्वेअर, लंडन<br>
दि.५ एप्रिल १९८६

प्रिय श्री मगदूम,

तुम्ही तुमच्या पत्रात लिहिले आहे की अर्ध्या एकरहून अधिक जमीन पूर्णपणे खडकाळ असून शेतीसाठी निरूपयोगी आहे. त्याने काही बिघडले नाही कारण त्याला लागून असलेली सात एकर जमीन खरेदी करण्याचे मी ठरविले आहे. त्यामुळे आपल्याजवळ एकंदर अकरा एकर जमीन असेल.

तुमच्या पत्रात उल्लेखिलेल्या खालील मुद्यांवर निश्चितपणे माहिती काढून मी निर्णय घेतले आहेत.

१) फार्म हाऊससाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची आवश्यकता नाही. जिल्हाधिकारी यांनी श्री.मल्होत्रा यांना लिहिलेल्या पत्राची कॉपी माझ्याकडे आहे.

२) शेतकी घराची कोणतीही विशिष्ट मापे नाहीत. श्री.धुमाळ यांनी जिल्हाधिकाऱ्यांना एक रजिस्टर्ड पत्र पाठविले होते, पण दोन महिने झाले तरी त्याचे उत्तर आले नाही.

३) ग्रामपंचायतीने परवानगी दिली आहे. ग्रामपंचायतीने हे निश्चितपणे कळविले आहे, की परवानगी देण्याचा अधिकार फक्त त्यांनाच आहे.

४) ही जागा हिरव्या पट्ट्यातील असून तिचा वापर शेतीसाठीच करायचा आहे. फार्म हाऊसचा उपयोग आम्हाला करता येईल व तसेच त्याचा उपयोग शेती उत्पादनाच्या साठवणीसाठी करता येईल. त्याच्यासाठी आपल्याजवळ प्लॅनिंग खात्याची परवानगी आहे.

माझे पती लवकरच सेवानिवृत्त होणार असल्याने माझ्या व माझ्या मुलींच्या परिवारांच्या गरजांच्या अनुसार घराचे नियोजन करण्याची माझी इच्छा आहे. माझ्या दोन्ही मुलींचे शेतकरी कुटुंबात विवाह झाले आहेत. विशेषतः धाकटे जावई माजी राष्ट्रपती कै.राजेंद्रप्रसाद यांचे नातू असून बिहारमधील विख्यात शेतकरी कुटुंबातील आहेत. शिवाय ते स्वतः शेतकरी आहेत. दोन्ही जावई आमचेजवळच राहून शेती करतील. मी पौडच्याजवळ, आमच्या फार्म हाऊसपासून जवळच, शेतजमीन घेण्याविषयी वाटाघाटी करीत आहे. आमचे कृषीविषयक सर्व काम याच फार्म हाऊसमधून होईल. तेव्हा याच्या प्लॅनमध्ये माझ्या जावयांनी सुचविलेल्या खालील गोष्टींचा अंतर्भाव करावा.

१) ट्रॅक्टर व इतर आधुनिक शेतीसाठी आवश्यक असलेली अवजारे ठेवण्यासाठी पाच गॅरेजेस

२) ११ फूट X २२ फूट साईजची सहा गोदामे

३) कमीत कमी ४४ फूट X २२ फूट साईजचा गाईंसाठी गोठा

४) शेती उत्पादनाची स्वच्छता व वाळवण करण्यासाठी मोठे अंगण व व्हरांडे

लखनौ येथे आमचे मोठे घर आहे. परंतु ते सरकारचे (इंडियन ऑईल कंपनी) ताब्यात आहे. नाममात्र भाडे देत असूनही व कराराची मुदत बऱ्याच

काळापूर्वी संपूनही ते लोक घर सोडण्यास तयार नाहीत. माझ्या पतीजवळ काळा पैसा नसल्याने आम्हांस फ्लॅट खरेदी करता येत नाही. याचेसाठी आम्हाला पुणे येथे फार्म हाऊसमध्ये रहावे लागेल. आमच्याजवळील सर्व पैसे हे फार्म हाऊसच्या बांधण्यात, शेत जमिनी खरेदी करण्यात व आधुनिक अवजारे खरेदी करण्यात आम्ही खर्च करणार आहोत.

तुम्ही आमचे लंडनमधील घर पाहिले आहेच. मी स्वत: शेतकरी व साधू बाबा असून झोपडीतही राहू शकते. परंतु माझ्या कुटुंबियांना आरामशीर जागा हवी. माझ्या पतीनी भारत सरकारची ४० वर्षे सेवा केली असून सेवानिवृत्तीच्या काळासाठी त्यांना आरामदायी घर असावे. तुमच्या माहितीसाठी म्हणून, आम्ही फार लहान घरात केव्हाही राहिलो नाही. आम्हाला येथून पुढे शहरात राहणे आवडणार नाही व वृद्धापकाळात आमच्या शेतीच्या जवळील घरामध्ये राहणे सोईचे होईल. शेती करणे हा फार्म हाऊसमध्ये राहण्याचा मुख्य हेतू असल्याने व फार्म हाऊसवर कोणत्याही मर्यादा नसल्या तरी खडकाळ जमिनीच्या बाहेर घराची व्याप्ती जाणार नाही याची काळजी घ्यावी. दहा व्यक्तींसाठी विस्तृत अशा बेडरूमस्ची सोय करावी. माझे पती आणि मी स्वत:, दोन मुली आणि दोन जावई आणि चार नातवंडे असे ते दहा जण होत. याचे शिवाय सर्वांना बसता यावे व जेवता यावे याचेसाठी एक मोठा सामाईक हॉल आणि मुलांना खेळण्यासाठी आतच विस्तृत जागा असावी. यांचेशिवाय येणाऱ्या पाहुण्यांसाठी मोठ्या आकाराच्या दोन गेस्ट रूम्स असाव्यात. माझ्या पतीचे गेस्ट आंतरराष्ट्रीय पातळीवरचे उच्च अधिकारी असल्याने त्यांना व आम्हाला साजेशी गेस्ट रूम असावी.

घराच्या दर्शनी भागावर भारतीय कलेची सजावट असावी व आतील भागात राजपूत पद्धतीची. आमचे पूर्वज पैठण येथे राज्य करणारे शालीवाहन राजे होते व ते राजपूत असून राजस्थानातून आले होते, हे तुम्हाला माहीत आहे.

आपले शेतकरी दरिद्री आहेत, असे आपण बाहेरील जगास दाखवित

असलो तरी ज्या फार्म हाऊसमध्ये मी गेले होते ती सर्व शेतीघरे फार मोठ्या आकाराची होती. उदाहरणार्थ माझ्या सासऱ्यांचे खैराबादमधील फार्म हाऊस तसेच माझ्या जावयांचे फार्म हाऊस व श्री.धुमाळ यांचे वीर येथील, राजा पाटील यांचे इचलकरंजी येथील, उषा पटेल यांचे दांडेली येथील, राऊळबाई यांचे व श्री योगी महाजन यांची पठाणकोट आणि धर्मशाळा येथील, ही सर्व शेतीघरे एकापेक्षा एक मोठी आहेत. तुम्ही त्यांच्यापैकी कोणतेही एक घर बघा. बहुतेक सर्व चार ते पाच मजली आहेत. तुम्ही ती घरे दृष्टीपुढे ठेवू नका. परंतु त्याची कपॅसिटी किती आहेत ते पाहण्यासाठी एकदा जाऊन आपले आलेले बरे. मला अशी स्पष्ट कल्पना देता येत नाही, परंतु तुम्हाला योग्य वाटेल त्याप्रमाणे घर लहान अथवा मोठे असावे.

तुमच्या पत्राप्रमाणे खडकाळ जमीन असल्याने आमचे घर ज्याठिकाणी पठारी भाग संपतो तिथे बांधावे. त्याचेसाठी कदाचित थोडा जास्ती खर्च येईल पण दोन हेतू साध्य होतील. पहिला म्हणजे चांगली शेत-जमीन शेतीच्या वापरासाठी उपयोगी येईल आणि दुसरे म्हणजे सखल भागातील शेतीच्या कामावर लक्ष ठेवता येईल. ती जमीन मी निश्चित खरेदी करणार आहे. फार्म हाऊसची कोणतीही व्याख्या नसल्याने तुम्ही कितीही मजली घर बांधू शकता. माझ्या मते दोन मजले पुरे आहेत.

तुम्ही लिहिल्याप्रमाणे कोणत्याही मर्यादा न पाळता फार्म हाऊस बांधले तरी ते पूर्णपणे कायदेशीर आहे. परंतु तुम्ही खडकाळ जमीनच वापरावी ही विनंती. हा भाग तुमच्या आवश्यकतेपेक्षा अधिक विस्तृत असल्यास अंगणाचा विस्तारही वाढविता येईल. अपुरा वाटल्यास एक मजला वाढविता येईल.

दर्शनी भागाचे स्ट्रक्चर आपण उभे करावे. कारण मला बाहेरच्या व आतील भागाकडे अधिक लक्ष द्यायचे आहे. पुणे शहरात बटबटीत सजावटीचे भरपूर फ्लॅटस् आहेत. म्हणून याचेसाठी फार्म हाऊस बांधणीमध्ये नाविन्य यावे याचेसाठी मी जयपूर येथून नाजूक डिझाईनच्या जाळ्या मागविणार आहे.

त्याचेमुळे कदाचित काही लोक तरी सुंदर घरे बांधतील. त्याचप्रमाणे माझ्या इतर शेतकरी मित्रांना शहरात जाऊन इतर लोकांबरोबर दारू पिणे व क्लबात जाणे यांच्यावर पैशाचा अपव्यय करण्याच्याऐवजी महाराष्ट्रात सौंदर्याची वाढ जास्त करण्यात मोठेपणा वाटेल. त्याचप्रमाणे आधुनिकतेच्या दिखावटीपणाऐवजी पुढच्या पिढीसाठी लोक काहीतरी निर्माण करतील. याशिवाय सर्वांना आवडेल अशी बांधणी केली तर तरुण वर्गाला प्रतिष्ठित शेतकऱ्याची मुले म्हणवून घेणे आवडेल व शहरात जाऊन कारकुनी करण्याचे आकर्षण वाटणार नाही.

अशाप्रकारचे फार्म हाऊस थोडे खर्चिक असले तरी मुंबई येथील महागड्या फ्लॅट इतके असणार नाही. मला वाटते दूरच्या खेड्यात दिसणाऱ्या फार्म हाऊसेसप्रमाणे प्रत्येक फार्म हाऊसच्या सजावटीमध्ये विविधता आणता येईल. आपल्या देशातील खेडेगावात राहणाऱ्या लोकांसंबंधी हे माझे स्वप्न आहे. माझे वडील संविधान संसंदेचे सभासद होते व त्यांचेही स्वप्न होते, की प्रथम खेड्यांचा विकास व्हावा. त्याठिकाणी प्रत्येक शेतकऱ्यासाठी फार्म हाऊस म्हणून एक सुशोभित व सर्वांना आवडेल असा वाडा असावा म्हणजे मुलेसुद्धा शहरात जाण्याऐवजी त्यांच्या वडिलांप्रमाणे शेतकरी होतील. एक दिवस हे प्रत्यक्षात उतरेल अशी मला आशा आहे. चीनमध्ये यापूर्वीच हे सर्व निर्माण झाले आहे. गांधीजींच्या पद्धतीने चिनी लोकांनी खेड्याचा विकास कसा केला आहे हे मी चीनमध्ये गेले असताना प्रत्यक्ष पाहिले आहे.

या प्रदीर्घ पत्रामुळे तुम्हास राग आला नसेल असे मला वाटते. फार्म हाऊससंबंधी कोठेही लेखी स्वरूपांत माहिती उपलब्ध नसल्याने मला इतके सर्व स्पष्टीकरण द्यावे लागले व फोनवर इतके सांगणे शक्य नव्हते. माझ्या प्रॉपर्टीचे संबंधात माझी मते इतरांपेक्षा वेगळी आहेत, हे तुम्ही जाणताच. मला फार आरामदायी व आधुनिक घर बांधणे शक्य होते, पण मला नेहमीच वाटते, की अशा घरात कोणत्याच संवेदना नसतात. आपली गहन संस्कृती, कला व प्रतिष्ठा यांचा प्रत्यय या घरांमधून येत नाही. श्री.पाटणकर यांना राजपूत कलेचा अभ्यास

करून कमानी व ट्रेलीस कामाची चित्रे तयार करण्यास मी या पूर्वीच सांगितले आहे. या विषयावर काही पुस्तकेही विकत घ्यावी. या घरावर जो काही खर्च करावा लागेल त्यातून लंडन येथील कंटाळवाणे व जडात्मक घराऐवजी अस्सल भारतीयत्वाच्या भावना जागृत करणारे घर मला निर्माण करायचे आहे. माझा दृष्टिकोन, विशेषत: या संबंधातील, तुम्ही लक्षात घ्याल ही आशा आहे. कळावे.

तुम्हाला व तुमच्या कुटुंबीयांना माझे आशीर्वाद!

**तुमची प्रेमळ**
**माताजी निर्मलादेवी**

दि.५ नोव्हेंबर १९८६ रोजी, विनायकी चतुर्थीच्या दिवशी घराचा सांगाडा पूर्ण तयार झाला. श्रीमाताजींनी, त्यास त्यांचे पूर्वज शालिवाहन राजे यांच्या राजधानीच्या नावावरून प्रतिष्ठान हे नाव ठेवले.

दरम्यान हे फार्म हाऊस पाडले जावे याचेसाठी कारस्थान रचले जात होते कारण पुण्यातील एक बिल्डर व काही राजकारणी लोकांना या भागात शेतीचे काम होऊ नये व हा निसर्गरम्य हरित भाग, शेतीस अयोग्य असल्याचे नावाखाली लॉस व्हेगासप्रमाणे व्हावा असे वाटत होते. महाराष्ट्रातील एका विचित्र कायद्यानुसार शासनास काही रक्कम देऊन परवानगी घेतल्याशिवाय शेतजमिनीचा उपयोग बांधकामासाठी करता येत नाही. याच्यामुळे मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार निर्माण झाला आहे व त्यांत राजकारणी व माफीया यांचे संगनमत आहे.

श्रीमाताजींची शेतकऱ्यांसाठी अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाणांची व चैतन्य लहरी दिलेल्या झाडांची शेती करण्याची योजना असल्याने उपरोक्त माफीयाची योजना बारगळली होती. माफीयाने नंतर शासनास एक खोटी केस उभी करण्यास भाग पाडले की शेतजमीन अयोग्य आहे व 'प्रतिष्ठान' हे फार्म हाऊस नसून मंदिर आहे. मग शासनाकडून प्रतिष्ठानचे काम का पाडू नये? याची कारणे दाखवा

नोटीस दि.२५ मार्च १९८६ रोजी बजावण्यात आली श्रीमाताजींचे नाव शक्य तेवढे मलीन व्हावे या हेतूने सकाळ या वृत्तपत्रात खोटी व निंदाव्यंजक वृत्ते प्रसिद्ध करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांचे कार्यालयातून गुन्हेगाराप्रमाणे श्रीमाताजींचे बँक अकाऊंट तपासण्यास आले. तथाकथित मंदिरासाठी लोकांचा पैसा वापरण्यास आला आहे का? अशी विचारणा करण्यात आली. तपासात आढळले, की श्रीमाताजींच्या पतींच्या फॉरेन एक्स्चेंज खात्यामधून श्रीमाताजींना पैसे मिळाले आहेत. तसेच लाइफ इटर्नल ट्रस्ट यांचे पैसे वापरण्यात आले आहेत का, असाही धर्मादाय आयुक्त यांचेकडे तपास करण्यात आला.

श्रीमाताजींनी कोर्टाकडून बांधकाम पाडण्यास स्थगिती करणारा आदेश दि.२ मे १९८७ रोजी आणला. तेव्हा माफीयाने बांधकाम पाडण्याचा आदेश प्रतिष्ठानचे गेटवर चिकटविण्यास शासनाचे लोकांस भाग पाडले. श्रीमाताजींच्या मुखत्यारांनी १८ मे रोजी पुन्हा कोर्टाकडून स्थगिती आदेश मिळविला. शासनाने गुप्तपणे २७ मे रोजी स्थगिती आदेश उठविला. श्रीमाताजी न्युझिलंडमधून दुसऱ्या दिवशी परतल्या. प्रतिष्ठान वाचविण्यास फक्त एकाच दिवसाचा अवधी होता. श्रीमाताजींनी रात्रभर जागून मुंबर्स हायकोर्टात दाखल करण्यास अर्ज तयार केला व दि.२८ मे रोजी हायकोर्टाने स्थगितीचा आदेश दिला. त्यांचे आदेशात न्यायाधीशांनी म्हटले आहे सकृत दर्शनी ‘अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांच्या दोषपूर्ण आदेशात प्रतिपक्षाच्या विरुद्ध निकाल देण्यापूर्वी त्यांस त्याची बाजू मांडण्याची मुभा देण्याच्या सर्वमान्य पद्धतीस नकार देण्यात आला आहे. बांधकाम पाडण्यास पुढील आदेशापर्यंत मनाई करण्यात येत आहे.’ दि.४ नोव्हेंबर १९८८ रोजी श्रीमाताजींच्या बाजूने मुंबई हायकोर्टाने निर्णय दिला.

अशाप्रकारे श्रीमाताजींनी एकटीने कोर्टात लढून विरोधकांना नामोहरम केले. यात त्यांचे कायद्यावरील प्रभुत्व आणि वकिलीमधील कौशल्याचा प्रत्यय आला.

कोर्टाचे काम चालू असताना मुद्दा लक्षात घेऊत तो खोडून काढण्यात त्यांची तीक्ष्ण बुद्धिमत्ता दिसून आली. कोर्टामध्ये आपली बाजू त्या स्वत:च मांडण्यास तयार होत्या. आश्चर्य म्हणजे त्यांनी कोर्टात जाण्यापूर्वी एकही कायद्याचे पुस्तक वा कागदपत्र पाहिले नव्हते कारण ते सर्व काम त्यांचे पतीच पहात असत. त्यांच्या पतींनी कायद्यामध्ये दोन वेळा पीएच.डी. केली आहे. परंतु या केसच्या वेळी ते लंडन येथे कार्यमग्न असल्याने श्रीमाताजींनी त्यांना त्रास दिला नाही. श्रीमाताजींचे बहुअंगी व्यक्तिमत्त्व हे अनेक पैलू असलेल्या हिऱ्याप्रमाणे आहे. ज्या पैलूवर त्यांच्या चित्ताचा प्रकाश पडेल तो प्रकाशित होऊन सर्व माहिती प्रकट करतो.

# १३ : कृषी

‘परमेश्वर सर्व जीवित कार्य करतो. तुम्हाला बीजाला अंकुरीत करता येत नाही. बीजाला अंकुरीत करण्यास त्याचे जमिनीत रोपण करावे लागते.’ परंतु श्रीमाताजी बीजे अंकुरीत करू शकतात व वाळलेल्या फुलांना परत ताजे करतात. १९९१ साली ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात, सिडनी येथे श्रीमाताजींचे विमान उशिरा आल्याने त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित असलेल्या शंभरावर सहजयोग्यांनी आणलेली फुले त्यांना स्वीकारता आली नाहीत. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी फुले मागविली, पण ती सर्व कोमेजली होती. ती सर्व फुले त्यांनी स्नानाच्या टबात घालून पाणी व्हायब्रेट केले. संध्याकाळपर्यंत ती फुले परत नुकतीच झाडावरून तोडल्याप्रमाणे ताजी व नुकतीच उमलल्यासारखी झाली होती. सर्व जीवित गोष्टींची वाढ त्यांना स्वत:च्या पॅरासिंपथेटिक नाडी संस्थेमध्ये जाणविते. ‘त्या ग्लॅडीओली फुलांची एनर्जी जात आहे, कळ्या जरा उघडा, गुलाबाला उन्हं द्यायला हवी, ते झाड मरणार आहे, त्याची व्हायब्रेशन्स वाढवा.’ प्राणी व वनस्पती, माणसांपेक्षा अधिक श्रीमाताजींच्या व्हायब्रेशन्सना प्रतिसाद देतात. याचे कारण त्यांना अहंकार नसतो, हे असावे.

कृषीविषयक संशोधनासाठी त्यांनी पुणे येथे सर्व व्यवस्था केली आहे. चैतन्य लहरी दिल्याने एक फुटापेक्षाही अधिक व्यासाची सूर्यफुले उगविल्याने कृषी खात्यास सहजयोगाबद्दल औत्सुक्य वाटले. नीरा नरसिंगपूर या गावात सहजयोग पद्धतीने असंकरीत बियाणांच्या उत्पादन विषयात संशोधन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने त्यांना जमीन मंजूर केली. संकरीत बियाणांमुळे सुरुवातीला उत्पादन मोठ्या प्रमाणावर आले तरी गरीब शेतकऱ्यांना ती घेणे परवडत नाही. शिवाय त्यांच्यात व्हायरस प्रतिकार करण्याची शक्ती नसते. त्यांच्यावर औषधाचा फवारा मारण्याची आवश्यकता असते व ते फार खर्चीक असते. असंकरीत बियाणे पाण्यात बुडवून ठेवून श्रीमाताजी त्यांची शक्ती नाट्यमयरीत्या



वाढवितात. एका ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञाने या पद्धतीचा उपयोग केला. त्यांच्या संशोधनात आढळले, की चैतन्य लहरी मिश्रित पाणी शेतास दिल्याने उत्पादनात दुपटीने वाढ होते.

देशी गायींना चैतन्य लहरी देऊन त्यांच्या दूध देण्याच्या क्षमतेमध्ये वाढ होते. शिवाय असेही आढळले आहे, की चैतन्य लहरींच्या दृष्टीने भारतीय गायीच्या दुधाची गुणवत्ता संकरीत गायीच्या पेक्षा उच्च असते.

१९८२ सालात महाराष्ट्रात हिरवी झाडे निर्माण व्हावीत यासाठी राहुरी कृषी विद्यापीठाने श्रीमाताजींना विशेष अनुदान मंजूर केले. चैतन्य लहरीच्या साहाय्याने रशियातील कृषी उत्पादन कसे सुधारावे यासंबंधी श्रीमाताजींनी त्या देशातील शास्त्रज्ञांना उपदेश दिला.

श्रीमाताजींना फुले आवडतात व सर्व जगातून त्यांनी झाडे मागविली आहेत. १९९३ सालात त्यांनी पुणे येथे ट्युलिप या झाडाचे उत्पादन सर्वात प्रथम केले. त्यांच्या शेतावरील गुलाबांना अनेक प्रदर्शनात पहिली बक्षिसे मिळाली आहेत. बंगलोर येथे टिशू कल्चरच्या पद्धतीमध्ये क्रांतिकारी परिवर्तन झाले आहे.

कृषिक्षेत्रात शेतकऱ्यांना आत्मसाक्षात्कार देऊन व सहजयोगाच्या पद्धतीच्या आचरणाने एक शांतिमय क्रांती घडून येत आहे व शेतकऱ्यांना आनंद व आर्थिक भरभराट यांचा लाभ होत आहे.

# १४ : ईश्वरी अर्थशास्त्रज्ञ

श्रीमाताजी नम्रपणे म्हणतात, की त्यांना चेक कसा काढायचा याची माहिती नाही, पण त्यांनी लंडन येथील एका प्रसिद्ध बँकेची, परदेशी चलनाच्या विनिमय दरात प्रचंड घट होत असताना, एका व्यवहारातील चूक निदर्शनास आणली होती. शेअर बाजारातील चढ उतारावर आधारित आर्थिक गुंतवणुकीवर त्यांचा विश्वास नाही. परंतु रिअल इस्टेटमध्ये आपल्या पतीच्या तर्फे त्या लाभदायी आर्थिक गुंतवणूक करतात. अनेकदा बॅलन्सशीट वाचून चार्टर्ड अकाऊंटंटच्या चुका दाखवितात. हे महालक्ष्मीचे फक्त थोडेसे गुणवर्णन आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील लिबरलायझेशनच्या धोरणाचे संदर्भात त्यांनी अर्थ मंत्रालयाला मौलिक सूचना केल्या होत्या. त्यांच्या ज्ञानाविषयी भारताच्या अर्थमंत्र्यांनाही फार आदर आहे.

१९९१ सालच्या जुलै महिन्यात, खरेदी करण्याच्या उद्देशाने श्रीमाताजी एका किल्लेवजा घराच्या शोधात होत्या. कलात्मक वस्तूंचा व्यापार करणाऱ्या एकाने मिलान शहराजवळील आपला एक किल्ला देऊ केला, पण ५० टक्के किंमत नोंदणी करण्याच्या पूर्वीच मागितली. श्रीमाताजींचा आग्रह होता की खरेदी खताची नोंदणी झाल्यावर अथवा नोंदणी करते वेळी पैसे दिले जातील. मालकाने सांगितले, की त्याची भागीदार मुलगी सुट्टीवर असल्याने त्याला हे जमणार नाही. सर्व सहजयोग्यांवर घराचा भव्यपणा व मालकाचे वागणे यांचा प्रभाव पडला, पण श्रीमाताजी कणखर राहिल्या व शेवटी व्यवहार झाला नाही. नंतर समजले की, तो व्यापारी लबाड होता व श्रीमाताजींचे नुकसान झाले असते. श्रीमाताजींची दूरदृष्टी व लोकांची पारख व त्यांच्या जजमेंटवर प्रश्न करणे सहजयोग्यांनी बंद केले. शेवटी श्रीमाताजींनी कबेला येथे अधिक मोठे घर एक चतुर्थांश किंमतीत खरेदी केले.



कबेला कॅसल, इटली

मानवी मनाचे ज्यात प्रतिबिंब दिसावे अशा दर्पणाप्रमाणे श्रीमाताजी आहेत. त्यांच्या विश्लेषणापेक्षाही अधिक, त्यांच्या डोळ्यातून माणूस स्वत:विषयी शिकतो. समोरच्या व्यक्तीसंबंधी त्या सर्व जाणत असल्या तरी त्यांच्या प्रतिक्रिया अगदी नवख्या माणसाप्रमाणे असतात. जीवनाच्या विविध क्षेत्रांतील माणसे अनेकदा त्यांच्या सहवासात एक दुसऱ्यांच्या शेजारी बसलेली असतात व प्रत्येकाशी सहजपणे त्याला समजेल असे श्रीमाताजी बोलतात. लहान मुलाला बाहुलीचे नाव विचारतील, शेतकऱ्याशी पीक पाण्यावर बोलतील. जुन्या मित्र-मैत्रिणीशी जवळीक असेल, तर त्यांच्यातील कर्तव्यदक्ष पत्नी हळूवारपणे पतीस म्हणेल, 'थोडा गारठा आहे माझी शाल घ्या.' मुलींच्या बरोबर खरेदीसंबंधी बोलतील. तर नातीच्या बरोबर फॅशनसंबंधी. क्रेमलीनमधील मंत्र्यांशी कृषी विकासावर चर्चा करीत असतील अथवा 'श्रीमाताजी तुम्ही कोण आहात?' अशा पत्रकारांच्या प्रश्नास हसत उत्तर देतील, 'प्रथम आत्मसाक्षात्कार घ्या म्हणजे समजेल, मी कोण आहे!' त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ही वैविध्यपूर्ण अभिव्यक्ती उत्स्फूर्त असून त्यांची भाषणे योजनाबद्ध नसतात, सहजरीत्या त्यांचे भाषण विद्यमान स्थितीला धरून असते.

परमेश्वरी प्रेमाची सर्वव्यापी शक्ती सर्वांची काळजी घेऊन कसे रक्षण करते ते वरील निरीक्षणावरून समजेल. हे सर्व कसे घडते, ते त्याच जाणो! वीज कशी काम करते, हे समजले नाही तरी त्याने काही फरक पडतो? त्यांचा उपयोग करावा. त्यांचे इंटरेस्टस इतके आहेत की, त्या प्रत्येक गोष्टीत व प्रत्येकाच्या कल्याणात इंटरेस्टेड आहेत.

भारतातील बेरोजगारीची त्यांना फार काळजी वाटते. कुशल कारागिरांना मदत करता यावी म्हणून त्यांनी हस्तकलात्मक वस्तू युरोपमधील देशात विक्रीसाठी ठेवण्याची व्यवस्था केली. युरोपियन बाजारपेठांना योग्य अशी डिझाइन्स तयार केली. आता टेरा कोटा, पोर्सेलीन, सिरॅमिक, पितळ, लाकडी कोरीव काम इत्यादींच्या हस्तकलात्मक वस्तूंचा मोठा व्यवसाय युरोपमध्ये प्रगती करत आहे. त्यांच्या प्रेमाचा व कारुण्याचा लाभ खेड्यातील गरिबांपर्यंत असा पोहोचतो.

त्या म्हणतात, ‘आपण दुसऱ्याची नक्कल करून त्यांच्या प्लॅस्टीकच्या वस्तू आपल्या डोक्यावर घेऊ नये. आपण आपल्या देशाला मदत करावी. प्रत्येक देशाचा प्रत्येक भाग विकसित झाल्यास सर्व जग सशक्त होईल. नैसर्गिक गोष्टींना धरून राहणेच चांगले. कारण जड गोष्टीचे कृत्रिम प्रभुत्व आपल्या आत्म्याला नष्ट करते. देणगी रूपाने दिलेल्या पैशाचा दुरूपयोग झाल्याचे अनेक वेळा दिसून आल्याने देणगी देण्याऐवजी रोजगार, वैद्यकीय मदत, चांगले शिक्षण, शेतकऱ्यांसाठी चांगली बियाणे, व्हायब्रेशन्स देऊन देशी गायीत सुधारणा वगैरे कार्यावर श्रीमाताजींचा भर असतो.



## १५ : संगीताच्या महान आश्रयदात्या

प.पू.श्रीमाताजी कला व संगीत यांच्या महान आश्रयदात्या असून शास्त्रीय संगीतास नवजीवन देण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. आधुनिक संगीत, चक्रांना व मेंदूच्या पेशींना नुकसानकारक आहे व अशा प्रकारचे अपायकारक संगीत ऐकण्याची आवड असलेल्या बऱ्याच लोकांना स्मृतिनाशाचा व दिशांचे भान नसण्याचा त्रास होतो. याचे उलट साक्षात्कारी जीवांनी परमेश्वराचे स्तुतिपर रचलेले शास्त्रीय संगीत चक्रांना व नसांना सुखविणारे असते. आत्मसाक्षात्कारानंतर गायक वा वादक कलाकार सहस्रारातून गातात व वाजवितात. त्यांच्यामुळे ऐकणाऱ्यांवरही तसाच परिणाम होतो व ते सुखद आनंदाच्या अवस्थेत उन्नत होतात.

आत्मसाक्षात्कारानंतर कलाकारातील सूक्ष्मगुण बहरून येतात. अनेक उदयोन्मुख कलाकारांना १९८० सालानंतर आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर, निष्णात महान कलाकार अशी मान्यता प्राप्त झाली आहे. त्यांच्यापैकी काहींची नावे प्रा.देबू चौधरी, उ.अमजद अली खान साहेब, प्रसिद्ध पार्श्वगायिका हेमलता, श्री.अरुण आपटे, श्री.अजीत कडकडे, श्री.आनंद मुर्डेश्वर, प्रसिद्ध तबला वादक उ.झाकीर हुसेन, वगैरे. प्रसिद्ध तबलावादक उ.शफाद अहंमद यांच्यासंबंधी एक मजेदार घटना; एका नवीन कलाकारांनी १९८५ साली श्रीमाताजींच्या उपस्थितीत तबला वाजविला होता. काही वर्षे गेल्यावर पुण्यात झालेल्या एका संगीताच्या कार्यक्रमात एका महान तबला वादकाने सर्व श्रोत्यांची मने जिंकली. त्या कलाकाराच्या व्हायब्रेशन्स वरून त्याला आत्मसाक्षात्कार दिल्याचे श्रीमाताजींच्या स्मरणात होते, पण तो इतका बदललेला होता की सहजयोग्यांना तो ओळखू आलाच नाही. त्यांनी आशीर्वाद दिल्याचे आभार मानले.

सर्व मोठ्या संगीतकारांना श्रीमाताजींच्या उपस्थितीत गाण्याची इच्छा असते. या प्रसंगाचे वर्णन ते परमेश्वराचा अनुभव असे करतात. श्रीमाताजी त्यांना एकदम निराळ्या अवस्थेमध्ये गेऊन जातात, की ज्यामध्ये ते काय गातात, काय वाजवतात हे त्यांना समजत नाही. संगीतकार संगीतच होतात. कलाकार कला होतात. पं.भीमसेन जोशी, पं.जसराज, बेगम परवीन सुलताना वगैरे महान कलाकारांनी अशा तन्मयतेच्या अनुभवाची आठवण अद्यापही जतन केली आहे. श्रीमाताजींच्या उपस्थितीमध्ये संगीताने निर्माण होणाऱ्या चैतन्य लहरींची पातळी इतर प्रसंगी निर्माण होत नाही. श्रीमाताजींच्या ईश्वरत्वाची ओळख कलाकारांना त्यांच्या संवेदनांमधून लवकर होत असावी. परवीन सुलताना यांच्या मुंबई येथील कार्यक्रमात एका सिनेमातील गाणे म्हणावयाची सूचना करण्यात आली असता त्या रागाने म्हणाल्या, ‘मी कोणासमोर गात आहे हे समजत नाही कां ?’

एकदा उस्ताद बिस्मील्ला खान साहेब स्वित्झर्लंडहून पॅरीसला रेल्वेने येत असता काही सहजयोग्यांची व त्यांची भेट झाली. सहजयोगीजन श्रीमाताजींना भेटण्यास जात असल्याचे त्यांना समजले. तेव्हा बिस्मिल्ला खान यांना फार आनंद झाला व पॅरीसला पोहोचल्यानंतर श्रीमाताजींसमोर वाजविण्याची इच्छा त्यांनी प्रदर्शित केली. श्रीमाताजींसामेर वाजविण्याची संधी हा फार मोठा सन्मान असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय सहजयोग्यांचे तुम्ही ‘वली’ म्हणजे संत आहात असे कौतुक त्यांनी केले. पाश्चात्त्य लोकांची आपल्याशी समरसता होऊ शकते, याचे उ.बिस्मिल्ला यांना आश्चर्य वाटले. देवीच्या भक्तीचा श्रोते व महान कलाकार यांच्यामध्ये सुसंवाद होता.

कलागुण म्हणजे परमेश्वराच्या संदेशाचा प्रसार करण्यासाठी त्यानेच दिलेली देणगी आहे, हे जाणून कलाकार आपली कला त्यांनाच अर्पण करतात. परंतु श्रीमाताजींचा आग्रह असतो की कलाकारांनी, प्रसिद्धी व वैभव प्राप्त करून देणारा महालक्ष्मीचा आशीर्वाद आपल्याकडून स्वीकारावा. रिकाम्या हातांनी येणाऱ्याच्या नियतीचा मार्ग श्रीमाताजीच ठरवितात.

इतर योगापेक्षा सहजयोगाचा वेगळेपणा हा आहे, की सहजयोग आनंदमय आहे व लोक आपला आनंद संगीत व नृत्यातून व्यक्त करतात. सहजयोगाच्या पूजा म्हणजे देवीचा विजयोत्सवच. प्रतिवर्षी जगभरचे सहजयोगीजन गणपतीपुळ्याच्या समुद्र किनाऱ्यावर एकत्र येतात, तेव्हा सात रात्री भक्ती संगीत व नृत्याला वाहिलेल्या असतात. महाकवी रविंद्रनाथांनी या आनंदोत्सवाची भविष्यवाणी पूर्वीच केलेली आहे. 'सर्व वंशाच्या लोकांना, भारताच्या किनाऱ्यावर आईची पूजा करण्यास या.'

सहजयोगात पारंपारिक पद्धतीने सर्व जातींच्या व विचारसरणीच्या जोडप्यांचे विवाह होतात. सहजयोगाने व्यक्ती अरसिक होत नाही, तर आनंदी व उत्साही व्यक्तिमत्त्व तयार होते.





# १६ : चंद्र, सूर्य चरणी लीन

'आणि स्वर्गात महान आश्चर्य घडले. चरणांखाली सूर्य व चंद्र व मस्तकावर बारा ताऱ्यांचा मुकुट परिधान केलेली स्त्री' - पवित्र बायबलमधील प्रकटीकरण श्रीमाताजींची स्मृती फोटोप्रमाणे सुस्पष्ट असून त्यांच्या जीवनातील कोणताही प्रसंग अगदी जसाच्या तसा त्यांना आठवतो. संस्कृत अथवा हिंदी या भाषांचा अभ्यास न करताही त्या संस्कृत श्लोक पाठ म्हणतात. धार्मिक ग्रंथांचे त्यांनी वाचन केले नाही. परंतु त्यांच्यातील उदाहरणे त्या सहज देतात. श्री.योगी



महाजन यांचे प्रकाशित 'गीता' हे पुस्तक वाचून श्रीमाताजी त्यात सुधारणा सुचवीत असताना, असे दिसले, की श्रीमाताजींना सर्व संस्कृत श्लोकांचा अर्थ माहीत होता. शिवाय लेखकाने संस्कृत श्लोक लिहिण्यात केलेल्या चुका सुद्धा त्यांनी सुधारल्या. त्यांच्या ज्ञानाच्या प्रकाशामुळे पुस्तकांचे 'गीता' हे नाव 'प्रकाशित गीता' या नावात परिवर्तित झाले. त्यांच्यामधील हे अंगभूत ज्ञान कोठून आले? थोड्याशा जाणिवेतूनही लक्षात येईल, की हे ईश्वरी ज्ञान असले पाहिजे.

अनेक वेळा प्राचीन मंदिरे व स्मारकांना श्रीमाताजी भेट देतात तेव्हा त्यांच्या



त्या विशिष्ट अवतरणाच्या काळातील त्या स्थानाचा सर्व इतिहास सांगतात. त्यांच्या बंधूंच्या समवेत इराण देशातील ऐतिहासिक पार्सी पोलिस शहरातील फेहा या प्राचीन स्थानाच्या भग्न अवशेषांना भेट दिली. तेव्हा इंद्राचे सिंहासन कोठे होते, तिथे जाण्याचा दरवाजा कोठे होता, दरबारातील मानकरी कोठे बसत होते वगैरे बारीकसारीक माहिती जणू काही कालच त्यांचे त्या ठिकाणी वास्तव्य होते इतके त्या सहज सांगत होत्या. त्यांच्या ज्ञानाचे गाईडलाही आश्चर्य वाटले व पुष्कळ नवीन माहिती त्याला मिळाली.

एकदा पाश्चात्त्य सहजयोग्यांनी नाशिक येथे सीता नहाणी नावाने प्रसिद्ध असलेल्या एका स्थानाला भेट दिली. त्या ठिकाणी श्री सीता माई स्नान करीत होत्या असे स्थानिक लोकांनी सांगितले. श्रीमाताजींना त्यांच्या पूर्वीच्या अवताराच्या काळात ज्या ठिकाणी त्या स्नान करीत होत्या ती जागा आठवली. ती जागा स्नानासाठी सुयोग्य आकाराची असून फार मोठ्या प्रमाणावर तेथे चैतन्य लहरी आहेत. परमेश्वरी ज्ञानातून सर्व चैतन्याच्या वास्तू म्हणजे स्वयंभू स्थाने त्यांनी शोधली. देवीच्या या पूर्वीच्या अवतार काळात तिने आशीर्वादित केलेल्या स्थानांची सर्व हकीकत त्या सांगतात. उदा.महाराष्ट्रातील देवीची साडेतीन पीठे, कुंडलिनीची स्थाने, अष्टविनायकाची स्वयंभू स्थाने, कोणतीही देवतेची मूर्ती त्या तत्क्षण ओळखतात व मूर्तींच्या सर्व वैशिष्ट्यांची कोणत्याही पुस्तकात सापडणार नाही अशी माहिती त्या सांगतात. त्यांच्या ईश्वरी ज्ञानाचे नाव आहे निर्मल विद्या, ॲथेन्समध्ये अथिना देवतेचे मंदिर पाहताच, त्यांनी ओळखले, की हे आदिशक्तीचे मंदीर आहे व त्यांनी हे पण सांगितले की 'अथ' या संस्कृत शब्दाचा

अर्थ आहे. आद्य व ॲथीना देवतेने हातामध्ये कुंडलिनी शक्तीस धारण केले आहे. सहजयोगी जनांना त्या मंदिरात प्रचंड चैतन्य लहरींचा अनुभव आला. देल्फी येथील मंदिरात आतापर्यंत कोणाच्याही लक्षात आली नव्हती अशी श्री गणेशाची मूर्ती त्यांनी शोधली. ग्रीस देशात देव लोक होता पण सॉक्रेटीसच्या मृत्यूनंतर त्या देशातील लोक धर्माच्या स्थितीतून अधर्मात आले ही सर्वात मोठी शोकांतिका होती.

श्रीमाताजींची दैवी दृष्टी सर्व मितींच्या (डायमेंशन) मधील गोष्टी पाहू शकते. काही वेळेस त्यांच्या कृपेने सहजयोग्यांना त्यांच्या ईश्वरत्वाचे दर्शन घडणे शक्य होते. त्यांचा चेहरा ढगामध्ये इंद्रधनुष्यात दिसतो. अनेक आश्चर्यकारक फोटोमध्ये त्यांच्या ईश्वरत्वाच्या विविध अंगांचा प्रत्यय आला आहे.

एकदा धर्मशाळा येथे पूजा झाल्यावर त्यांनी हिमालयातून चैतन्य लहरी बाहर पडत असल्याचे दाखविले व सांगितले, की हिमालय स्वयंभू आहेत. आता हजारो फोटोमध्ये व्हायब्रेशन्स स्पष्ट दिसतात. मानवी दृष्टीपेक्षा कॅमेरा या सूक्ष्म गोष्टी चांगला टिपतो. काही फोटोंमध्ये श्रीमाताजींच्या चक्रांवर देवता दिसतात.

निसर्गाच्या चैतन्य लहरींना विशेष प्रतिसाद असतो. आल्पस्‌मध्ये एका गावात पूजेचा कार्यक्रम होता. त्या दिवशी प्रचंड वादळ आणि मुसळधार पाऊस होता. त्या खेड्यातील लोकांना भीती वाटली, की आता पूर येणार. सायंकाळी सहजयोगाचा संगीताचा कार्यक्रम होता. पाऊस कमी होण्याचे चिन्ह नव्हते. श्रीमाताजींनी वादळाला चैतन्य लहरी दिल्या व अर्ध्या तासाचे आत आकाश मोकळे झाले. श्रीमाताजींनी स्पष्टीकरण दिले की, ‘चैतन्य लहरींमध्ये अंगभूत बुद्धिमत्ता असून सर्वव्यापी चेतनेशी त्या संलग्न करतात, म्हणून त्यांच्याशी आपण जोडले गेलो की निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्यासाठी कार्य करीत असते.

१९९४ सालच्या नोव्हेंबर महिन्यात तुर्कस्तान देशातील एका शहराला श्रीमाताजींनी भेट दिली. त्या वेळी पावसाअभावी त्या शहरात मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाईचा त्रास होता. त्यामुळे तुर्की सहजगयोग्यांनी श्रीमाताजींना प्रार्थना

केली. श्रीमाताजींनी चैतन्य लहरी दिल्यावर दुसरे दिवशी सकाळीच मोठ्या पावसास सुरुवात होऊन तीन दिवस पाऊस पडत होता.

एखाद्या शहरास श्रीमाताजींची प्रथमच भेट असते त्यावेळी निसर्गास जणू आनंदाचे उधाण येते. हवेत उष्मा असेल तर तापमान कमी होऊन थंड हवा होते व थंडी असेल तर तापमान वाढून आल्हाददायक हवा होते. त्यांच्या स्वागतास बऱ्याचदा रिमझिम पाऊसही उपस्थित असतो.

## १७ : श्री कल्की

त्या काळात, प.पू.श्रीमाताजींचा जन्म बुधवारी झाला आणि बुधवारी २३ फेब्रुवारी २०११ साली (आदिशक्तीच्या म्हणजेच त्यांच्या) मर्जीनुसार, ८८ व्या वाढदिवसाच्या काही आठवड्यापूर्वी त्यांनी त्यांचे ऐहिक निवासस्थान सोडले.



साकार स्वरूपात प्रत्येक श्वासागणिक (त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत) त्यांनी विश्वाच्या कल्याणासाठी दैवी कार्य केले (आणि अजूनही सामूहिकतेमधून करीत आहेत.) एका महिन्यापूर्वी सहजी सामूहिकतेला आशीर्वादित केले. त्यांनी त्यांच्या ताब्यातील अखेरची मालमत्ता, पुण्यातील घर (प्रतिष्ठान) सहजयोगाला दान केले. त्या ख्रिसमस व नववर्षपूजेच्या प्रसंगी जिनोव्हा (इटली) येथे होत्या. न्यूमोनियाच्या दुखण्यामुळे त्यांना जिनोव्हा इस्पितळात दाखल करण्यात आले. भूतलावरील त्यांचे कार्य संपन्न झाले होते आणि विश्वामधील अधिक महान कार्याची पूर्तता करणे अखंडपणे चालू ठेवण्याची वेळ आली होती. त्यांच्या खोलीतील त्यांची मुले त्यांच्या (दिव्य) आत्म्याला जाऊ देणार नाहीत आणि म्हणून २३ तारखेस सकाळी त्यांनी इस्पितळातील कर्मचाऱ्यांना आणि कुटुंबीयांना खोलीतून बाहेर जाण्यास

सांगितले.

काही तासानंतर एक नर्सने त्यांना काही हवे आहे का ते पाहण्यासाठी आत डोकावून पाहिले, पण तिने जे पाहिले त्याने ती मंत्रमुग्ध झाली. खोली दाट धुक्याने भरली होती. त्या धुक्यामधून एक हत्तीचे मुख असलेले बालक (श्रीगणेश) प्रगट झाले आणि त्यांनी तिला खोलीत प्रवेश करण्यास प्रतिबंध केला. इस्पितळातील कर्मचाऱ्यांना बोलावून आणेपर्यंत श्रीमाताजींनी त्यांचा ऐहिक देह (मागे) ठेवला.

त्यांचे कुटुंबीय आणि मुले या बातमीने शोकसागरात बुडाले आणि कबेल्याला आदरांजली वाहण्यासाठी जनसागर लोटला. २७ तारखेला त्यांचा पवित्र देह विमानाने शाश्वत विश्रांतीस्थान, निर्मलधाम, दिल्ली येथे आणण्यात आला. जगाच्या सर्व कानाकोपऱ्यातून लाखापेक्षाही जास्त मुले त्यांनी या भूतलावर अवतार घेतल्याबद्दल आणि त्यांना मुक्ती दिल्याबद्दल हृदयापासून कृतज्ञता (ऋण) व्यक्त करण्यासाठी एकत्र जमली होती. गहनता प्रदान करणारी पूजा विधीवत संपन्न झाली. सुवासिनी म्हणून देवीला लाल रंगाची साडी अर्पण करण्यात आली. तिन्हीसांजेपूर्वी सूर्यदेवांनी त्यांच्या चरणाला स्पर्श करून वंदन केले. त्यांचा पवित्र देह पृथ्वीमातेत समाधिस्त झाला. त्यांच्या पवित्र देहातून चैतन्याचा धबधबा ओसंडून वाहत होता कारण पंचतत्त्वे त्यांच्याकडून चैतन्यमय झाली होती. (त्यांचे) प्रत्येक बालक चैतन्याने चिंब झाले होते.

आपल्या प्रिय मातेच्या महानिर्वाणाने त्यांच्या बालकांची हृदये पिळवटून निघाली. खरेतर ही अपरिमित हानी जग सहन करू शकले नाही. जणू काही ह्या क्षणाबद्दल दिव्य दृष्टीने त्यांनी आधीच जाणले होते. त्यांच्या आधीच्या भाषणांमधून त्यांच्या मुलांना त्यांनी निपुण केले. त्यांनी विशद केले की त्या हा देह नसून त्या परमात्मा (आदिशक्ती) आहेत जे शाश्वत आहे, सर्वव्यापी परमेश्वराची प्रेमशक्ती आहे. त्या त्यांच्या मुलांमध्ये कुंडलिनी स्वरूपात प्रतिबिंबित आहेत. सदैव त्यांचासुद्धा कुंडलिनीद्वारे त्यांच्याशी (श्रीमाताजींशी)

योग घटित झाला आहे.

पुष्कळदा त्यांनी खेद प्रगट केला, ''जेव्हा मी साकार स्वरूपात असते तेव्हा त्यांना माझे विराट स्वरूप पाहण्याची इच्छा असते. जेव्हा मी माझे विराट स्वरूप धारण करीन तेव्हा ते माझ्या साकार स्वरूपाला शोधू लागतील. निराकार आणि साकार स्वरूपाची माया ही अनंत आहे, परंतु निराकाराला साकार स्वरूप धारण करणे नेहमी शक्य असते.''

जर आपण कुंडलिनीवर जाणू शकलो तर आपल्याला समजेल, की त्या आपल्यापासून एक क्षणभरही दूर नाहीत. त्यांचे विराट स्वरूप हे दुसरे काही नसून करुणेची शक्ती आहे. जेव्हा आपण कनवाळू होऊ तेव्हा आपल्या शरीराच्या रोमारोमातून आपल्याला त्याची जाणीव होईल. त्यांच्या करुणेच्या सागराचा (म्हणजेच) त्यांचा दहावा अवतार श्री कल्की स्वरूपात उदय झाला आहे.

त्यांनी आपणास स्मरण करून दिले नाही का, की श्री कल्की स्वरूपास चेहरा नाही (निर्गुण-निराकार) ज्यू लोकांच्या परंपरेप्रमाणे (मसीहा) त्राता जो आहे, त्याला चेहरा नाही. (निर्गुण)

श्री कल्की स्वरूपात त्यांचे सान्निध्य उत्कटपणे आपल्याला जाणवू शकेल, जेव्हा आपण आपल्या आपापसातील मतभेदांवर मात करू आणि जेव्हा आपली करुणा वाढीस लागेल आणि संपूर्ण सामूहिकतेमध्ये आपण एकत्रित होऊ हीच आपल्या प्रिय मातेच्या चरणी सर्वात मोठी आदरांजली असेल. या आंतरिक परिवर्तनातून पुढील पिढ्यांना त्यांचा दैवी सुगंध आपल्याद्वारे प्राप्त होईल. स्वर्गामध्ये ज्याप्रमाणे त्यांच्या इच्छेची पूर्ती केली जाते त्याप्रमाणे पृथ्वीवरही त्यांच्या इच्छेची पूर्ती केली जाईल.

# १८ : परिशिष्टे

## रशियाचे माजी अध्यक्ष श्री गोर्बाचेव्ह यांना

## दि.२१ ऑगस्ट १९९० रोजी लिहिलेले पत्र

## भविष्यातील जागतिक व्यवस्थांसाठी माझ्या विनम्र योजना

सहजयोगामुळे सामूहिक चेतनेची जाणीव प्रस्थापित झाल्यावर वैयक्तिक आणि सामाजिक परिवर्तन व्हावे यासाठी माझ्या काही संकल्पना आहेत. सामूहिक चेतना ही एक स्थिती असून आत्मसाक्षात्कारातून आंतरिक परिवर्तन घडून आल्यानंतर ही स्थिती परिणाम स्वरूप प्राप्त होते. या स्थितीमधील व्यक्तीला सर्व जीवित कार्य करणाऱ्या सर्वव्यापी प्रेमशक्तीची अनुभूती येते आणि त्यामुळे संपूर्ण जग हा एक देश आहे, सर्व मानवामध्ये आणि मानवी तत्त्वज्ञानाच्या मागे एकच सत्य आहे अशी त्याची दृष्टी असते आणि एक वैश्विक दृष्टीकोन विकसित होतो. आपण अशी दृष्टी असलेली व्यक्ती आहात व आपल्या सर्वांच्या सामाईक भविष्यासाठी योजना तयार करू शकाल, असा मला विश्वास आहे.

उपरोक्त सामूहिक चेतना आपल्या सर्वांना जागतिक शासनाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेली सुज्ञता व शक्ती देईल. या सामूहिक चेतनेतून आपल्याला खालील गोष्टी सहज विकसित करता येतील.

१) आपल्याला अशी राजकीय व्यवस्था प्रस्थापित करता येईल की जी स्वार्थी संकुचित प्रवृत्तींना वाव न देता सत्याच्या नियमाशी सुसंगत अशा निर्णय प्रक्रियेत परिणामकारक सहभाग मिळवू शकेल.

२) मानवी उपभोगासाठी अत्यावश्यक गरजांची, देवाण-घेवाणीच्या (बार्टर) पद्धतीने पूर्तता करणारी संतुलित अर्थव्यवस्था निर्माण करता येईल. तसेच या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये वितरणाचे योग्य ते प्रमाण निश्चित

करण्यासाठी मागणी पुरवठा यांच्याप्रमाणेच, परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानवेतर आधारित, मूल्यमापन करणारी यंत्रणा समाविष्ट करता येईल.

३) सामूहिक चेतनेमुळे संपूर्ण समष्टिमध्ये समाधान असेल तरच व्यक्तीस समाधान मिळते. म्हणून कोणतेही प्रश्न व विसंवाद निर्माण न होता, सच्छीलता व उच्च जीवनमूल्ये यांच्यावर आधारित समाज व्यवस्था प्रस्थापित करणे शक्य होईल.

४) हितकारक दृष्टीकोन असलेल्या वैज्ञानिकांच्या मदतीने अशी तांत्रिक व्यवस्था कार्यान्वित करविता येईल, की जी विषयोपभोग व हव्यास या मानवी कमकुवतपणामधून उत्तेजन मिळून प्रगत होण्याऐवजी अत्यावश्यक व मानवी हिताच्या नियमांना धरून असलेल्या सर्वोच्च गरजांची पूर्तता करेल.

५) सांस्कृतिक संबंधाबाबतीत अशी जागतिक व्यवस्था निर्माण करणे शक्य होईल, की जी मानवी हितास पोषक अशा संस्कृतीची जपणूक करेल आणि भिन्न भिन्न वंश व संस्कृती यांच्यात परस्परांसाठी आदर व प्रेम वृद्धिंगत करेल.

६) पर्यावरण व भूमी यांच्यासंबंधी पूर्ण विचार करून यंत्रावर तयार झालेल्या मालाचे हातांनी बनविलेल्या वस्तूच्या उत्पादनाने संतुलन करता येईल. कलात्मक वस्तूंची अधिक निर्मिती झाल्यास जड पदार्थांचा उपयोग कमी होईल कारण कलात्मक वस्तूंची जपणूक केली जाईल.

७) जागतिक शिक्षण व्यवस्था अशी तयार करता येईल, की जी मुलांसाठी सोपी असेल व जिच्यामध्ये मुलांना कनवाळू व कार्यप्रवीण करण्यावर, त्यांना स्वतःच्या भाषेवर आणि शिवाय एक-दोन आंतरराष्ट्रीय भाषांवर प्रभुत्व मिळविता येईल याकडे लक्ष दिले जाईल.

८) प्रशासकीय यंत्रणा अशी विकसित करता येईल, की जी चालविणारे लोक प्रगल्भ संतांप्रमाणे आहेत व आत्मपरीक्षण करून स्वतःस सुधारण्याची क्षमता असणारे आहेत.

या आदर्शवादी कल्पना कदाचित काल्पनिक व न राबविता येणाऱ्या वाटतील, परंतु सामूहिक चेतनेच्या जाणिवेत प्राप्त होणाऱ्या क्षेत्राच्या (डायमेन्शन) मधून त्या सहज कार्यान्वित होतात. हा स्वानुभव आहे. सहजयोगात पंचेचाळीस देशातील हजारो योगी आहेत व त्यांच्यामध्ये अगदी व्यावहारिक पातळीवर या कल्पना सहज राबविल्या जात आहेत. तेजस्वी सत्याच्या प्रकाशात या ध्येयवादी कल्पना पूर्ण वास्तवामध्ये उतरल्या आहेत.

सहजयोगाचे द्वार प्रत्येकासाठी उघडे असून प्रत्येक मानवास सामूहिक चेतना प्राप्त करता येते. फक्त प्रश्न एकच आहे, की व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्याच्या क्षेत्रात प्रवेश करायचा असल्याने व्यक्तीच्या निवड स्वातंत्र्याचा सन्मान करावा लागतो. तेव्हा असे अनेक जण मुक्ततेच्या प्रमाणिक साक्षात्कारी जीवांना पाहतील तेव्हा उत्क्रांतीच्या उच्च प्रक्रियेत उतरण्याची त्यांनाही इच्छा होईल. उत्क्रांतीच्या सर्व प्रक्रिया अशा पद्धतीनेच निसर्गात कार्यान्वित झाल्या आहेत.

आत्मा ही मार्गदर्शक व नियंत्रक शक्ती आहे. आत्मा हा आपल्या अंतर्यामी रहात असलेला सामूहिक देह असून आपल्या चित्तात प्रकाशमान होऊन तो आपल्याला सामूहिक चेतना देतो. मग आपल्याला, स्वतःच्या व दुसऱ्यांच्या सूक्ष्म केंद्रांची जाणीव हातांच्या बोटावर होते. त्यांच्यात कशी सुधारणा करायची ते समजले, की आपल्या शारीरिक, बौद्धिक, भावनिक व आध्यात्मिक प्रश्नांवर आपल्याला मात करता येईल. अशा पद्धतीने आम्ही एक नवीन देवदूताप्रमाणे असलेल्या लोकांचा समाज निर्माण करीत असून तो सर्व मानवनिर्मित समस्यांवर शेवटी तोडगा काढेल. उदा.अनैतिकता, गरिबी, हिंसाचार, भ्रष्टाचार, व्यसने, पर्यावरणाच्या समस्या, आर्थिक शोषण व आक्रमण, संकुचित राष्ट्रवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद व युद्धे ही सर्व आधुनिक समाजास लागलेली कर्करोगाची व्याधी आहे व त्याचे कारण आहे, तथाकथित मानवी स्वातंत्र्याने मानवाला अज्ञानाच्या महान अंधकारात स्वतःस झोकून देण्याची मुभा ठेवली आहे.

तातडीने अमलात आणाव्यात यासाठी काही नम्र सूचना :

१) उपभोगाच्या वस्तू बनविणाऱ्या मोठ्या कारखान्याचे त्यामधील कामगारांना भागीदार करून घेऊन खाजगीकरण करावे. लहान कारखान्यातील कामगारांना नवीन कारखाने उघडण्यास पूर्ण परवानगी द्यावी.

२) जे मोठे कारखाने उपभोगाच्या वस्तू तयार करीत नाहीत त्यांच्यामध्ये तंत्रज्ञान, व्यवस्थापन व भांडवलाची गुंतवणूक यांच्या संदर्भात दुसऱ्या देशांच्या बरोबर करार (कोलॅबरेशन) करावेत.

३) जागतिक पातळीवरील धोरण जाहीर करावे, ज्यामध्ये सरकारने वाहतूक, संपर्क व्यवस्था, उर्जा, पाणी, औद्योगिक निवाडे यासंबंधी अस्तित्वात असलेल्या यंत्रणेमध्ये सुधारणा करण्याकडे लक्ष द्यावे.

भारतीय संविधान - वृत्तपत्रीय परिपत्रक

प्रजासत्ताक दिनाचे दिवशी परदेशी वार्ताहरांनी श्रीमाताजी निर्मलादेवी यांची डॉ.आंबेडकरांचा भारतीय संविधानाच्या निर्मितीमधील सहभाग, यांचे संदर्भात मुलाखत घेतली.

श्रीमाताजी - कोणत्याही एका व्यक्तीने संविधान तयार केले नाही. माझे वडील कै.प्रसादराव केशवराव साल्वे हे सुद्धा संविधान समितीचे सदस्य होते. त्यांचे चौदा भाषांवर प्रभुत्व होते व त्यांनी कुराण या ग्रंथाचे हिंदी भाषेत भाषांतर केले होते. अल्पसंख्यांक समाजातील अराखीव जागेवर निवडून आलेले ते एकमेव प्रतिनिधी होते. श्री.कृष्णस्वामी अय्यर, हे सर्वात प्रभावी व्यक्तिमत्व होते. संविधानाचा मसुदा कोणा एका व्यक्तीने तयार केला नव्हता. माझ्या वडिलांप्रमाणे डॉ.आंबेडकरसुद्धा अल्पसंख्यांक समितीचे सदस्य होते. त्या सर्वांची विभिन्न तत्त्वज्ञाने होती.

संविधान समितीचे सदस्य असल्याने त्यांना संविधानाचा मसुदा तयार

करण्याचा अधिकार होता. परंतु कोणासही श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्यावर टिका-टिप्पणी करण्याचा अधिकार नव्हता. संत असल्याशिवाय आणि संताची सखोल आध्यात्मिक दृष्टी असल्याशिवाय परमेश्वराचे अवतार व त्यांचे जीवन यांचेविषयी कोणताही अंदाज बांधता येत नाही.

ज्याप्रमाणे संतांना संविधानात बदल करता येणार नाही त्याचप्रमाणे संविधान समितीच्या सदस्यांनाही संतांनी श्रीराम व श्रीकृष्ण यांच्याविषयी जे सांगितले आहे त्यात बदल करण्याचा अधिकार नाही, परंतु या जगात परमेश्वरी नियम आपल्या हातात घेणाऱ्यांवर कोणतेही नियंत्रण नाही. तरीसुद्धा जगभरच्या लक्षावधी लोकांच्या भावना दुखविण्याचा कोणासही अधिकार नाही.

संतांनी वाईट व दिशाभूल करणाऱ्या पद्धतींचा प्रभावीपणे धिक्कार केला व त्यांचे निराकरण करण्यास अपार कष्ट घेतले. असे असले तरी बुद्धिजीवी लोक आपल्या अहंकारात अवतारी व्यक्तीचे दोष शोधून काढतात, तसे संतांनी केव्हाही केले नाही. मला मान्य आहे, की या क्षुल्लक विचाराचे स्तोम माजवून लोकांनी त्यांस विनाकारण महत्त्व व प्रसिद्धी दिली आहे. हे फारच अज्ञानीपणाचे, विचारशून्यतेचे व धोकादायक आहे. 'रिडल्स' या पुस्तकामध्ये अशी नुकसानकारक विधाने केली असतील याची कोणासही कल्पना नव्हती आणि अर्थात अवतारी व्यक्तींना आणि त्यांच्या पावित्र्याला व ईश्वरत्वाला त्याच्यामुळे कोणताही बांध येत नाही. पण त्यांना इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देणे अगदी अविचारीपणा होता कारण त्यांच्यामुळे व्यसने व स्वैराचार यांच्यात बुडालेल्या लोकांना स्वत:च्या वागण्यास समर्थन मिळाल्यासारखे वाटेल. शिवाय नव्या पिढीला येथून पुढे दृष्टीसमोर कोणताच आदर्श राहणार नाही व पश्चिमेकडील हिप्पी अथवा अंमली पदार्थांच्या व्यसनाधीन लोकांप्रमाणे ते लोकही वाहवत जातील. सध्याच्या या अती महत्त्वाच्या काळात जीवनमूल्यांची व्यवस्था घसरत असल्याने आपल्या मुलांच्या मार्गदर्शनासाठी आपल्याला शहाण्या लोकांची गरज आहे.

आपल्या देशात लोक जसे कोणत्याही विषयावर भांडणे करण्यासाठी दोन्ही बाजूस एकत्र येतात, तो एक विनोदच आहे. त्याच्याऐवजी त्यांनी चांगल्या रचनात्मक कार्यासाठी, समाजाची नैतिक मूल्यांवर पुनर्रचना करण्यासाठी, त्यांच्या प्रेमळ निर्माणकर्त्याला वंदन करण्यास एकत्र यावे अशी माझी इच्छा आहे.

## श्री.चंद्रिका प्रसाद श्रीवास्तव यांना नाईटहूडची पदवी

द टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राचे प्रतिनिधी श्री.एल.के.शर्मा यांनी
दि.९ जुलै १९९० रोजी पाठविलेले वृत्त

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या 'इंटरनॅशनल मेरी टाईम ऑर्गनायझेशन' या संस्थेचे भूतपूर्व महासचिव श्री.चंद्रिका प्रसाद श्रीवास्तव यांच्या आंतरराष्ट्रीय जहाज वाहतूक व्यवस्थेमधील कार्याचा ब्रिटन या देशाने गौरव केला असून त्यांना इंग्लंडच्या राणी यांनी नाईट हूडची सन्माननीय पदवी दिली आहे.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात, 'दि नाईट कमांडर ऑफ द मोस्ट डिस्टिंगविश्ड ऑर्डर ऑफ सेंट मायकेल अँड सेंट जॉर्ज' ही पदवी मिळालेले श्रीवास्तव हे पहिलेच भारतीय असावेत. ब्रिटिश सरकारने आयोजित केलेल्या भोजन समारंभात ब्रिटनचे वाहतूक मंत्री श्री.सेसिल पार्किन्सन यांच्या हस्ते श्री.श्रीवास्तव यांनी या पदवीचा स्वीकार केला. श्री.पार्किन्सन यांनी श्री.श्रीवास्तव यांच्या महासचिव या पदावरील कार्याचा गौरव केला. अलीकडच्या काळात ज्यांना ही सन्माननीय पदवी मिळाली आहे अशांच्यात राष्ट्रपती श्री.रोनॉल्ड रेगन व व्हायोलीन वादक यहुदी मेनुहीन यांचा समावेश होतो.

लंडन येथे मुख्य कार्यालय असलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आय.एम.ओ. या संस्थेवर श्रीवास्तव यांची १९७४ सालात प्रथम निवड झाली व त्यानंतर सलग चार वेळा त्यांची पुन्हा निवड होऊन गतवर्षीच्या डिसेंबर महिनाअखेर श्रीवास्तव या पदावर होते. जहाज वाहतूक व्यवस्थेवरी, जगात अनेक देशात शाखा असलेले विद्यापीठ स्वीडन या देशात, आंतरराष्ट्रीय जहाज वाहतूक व्यवस्थेवरच इटली या देशात एक प्रबोधिनी व माल्टा या देशात आंतरराष्ट्रीय जहाज वाहतुकीवरील कायद्याचे शिक्षण देणारी संस्था इ.संस्था प्रस्तापित करण्यात श्रीवास्तव यांनी पुढाकार घेऊन जे मोलाचे कार्य केले आहे

त्याची आय.एम.ओ. संस्थेच्या महासभेने स्तुती केली आहे.

संस्थेस कोणत्याही वादामध्ये ओढले गेले नाही हेच श्रीवास्तव यांच्या राजदूताच्या कार्य कौशल्याचे महान यश होते. या वार्ताहराशी बोलताना श्रीवास्तव म्हणाले, की प्रगत व अप्रगत दोन्ही देशांनी आपल्यावर जो सारखाच विश्वास टाकला, हा आपला सर्वात अधिक समाधानकारक अनुभव होता. जहाज वाहतूक उद्योग प्रगत तंत्रज्ञानावर आधारित असल्याने अविकसित देशांना जगातील जहाज व्यवसायात आपला सहभाग वाढविण्यास कठीण प्रयत्न करावे लागले आणि अविकसित देशांचा वाटा सहा टक्क्यांवरून पंचवीस टक्के इतका वाढला असेही त्यांनी सांगितले.

श्री.श्रीवास्तव यांच्या महासचिव पदाच्या प्रदीर्घ कारकिर्दीत आय.एम.ओ. संस्थेचा विस्तार झाला आणि सुरक्षित जहाज वाहतूक व स्वच्छ महासागर ही संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करण्यात आलेल्या करारांना व नियमांना जागतिक मान्यता मिळाली. तसेच विकसनशील देशांना जहाज वाहतुकीच्या क्षेत्रात अधिक स्वयंपूर्ण होता यावे म्हणून तांत्रिक सहकार्याचा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी श्रीवास्तव यांचेवर होती. श्री.श्रीवास्तव सध्या जहाज वाहतूक विषयावरील विद्यापीठाचे कुलपती आहेत.

श्री.श्रीवास्तव यांना पारितोषिके व सन्मान नवीन नाहीत. पश्चिम जर्मनी, इजिप्त, स्वीडन, नॉर्वे, फ्रांस आणि पोलंड इ. देशांच्या सरकारांनी प्रदान केलेल्या सर्वोच्च पदव्या व बक्षिसे यांनी श्री.श्रीवास्तव यांची खोली भरली आहे. नी.श्रीवास्तव यांनी आपल्या सरकारी नोकरीची सुरुवात वाणिज्य मंत्रालयाच्या उपसचिव पदावरून केली.

काही काळ मीरत व लखनौ येथील जिल्हा प्रशासन व जहाज वाहतुकीच्या महानिदेशालयात नोकरी केल्यावर ते शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या चीफ एक्झिक्युटिव्ह पदावर नियुक्त झाले व प्रारंभीच्या काळात कंपनीची जडणघडण

करण्यात मार्गदर्शन केले. सर्वात यशस्वी असलेली ही सार्वजनिक मालकीची संस्था प्रस्थापित करण्यातील त्यांच्या बहुमोल कार्याच्या गौरवार्थ १९७२ साली त्यांना पद्‌मभूषणची पदवी मिळाली.

शिपिंग कॉर्पोरेशनमधील त्यांच्या दोन कारकिर्दीमधील दरम्यानच्या काळात नवीनच स्थापन झालेल्या पंतप्रधान श्री.लालबहादूर शास्त्री यांच्या सचिवालयात श्री.श्रीवास्तव हे सहसचिव होते. श्री.शास्त्री यांच्या मृत्यूच्या वेळी श्री.श्रीवास्तव हे मॉस्को येथे होते.

सर्व सहजयोगी श्रीमाताजींच्या शरीरातील पेशी होतात. एखादा सहजयोगी आजारी झाल्यास अथवा त्याला काही त्रास होत असल्यास त्यांना ते स्वत:च्या शरीरात जाणवते आणि ते दु:ख स्वत:वर घेऊन स्वत:च्या शक्तीमुळे त्या दु:खाचे निराकरण करतात. अशा वेळी त्यांच्या शरीरात बदल होतात. पाय सुजून चालणे अवघड होते. पायांना थोडे मालीश केल्यावर हळूहळू व्हायब्रेशन्स मोकळी होऊन पाय पूर्ववत होतात. त्या सांगतात की, ‘तुमच्या सामूहिक कोणत्याही चक्रावर पकड असेल तरी मला त्याचा त्रास होतो व त्याचे निराकरण करावे लागते. त्याचे निराकरण मला करावेच लागते. मला ते अनिवार्य आहे. मी तुम्हाला माझ्या आतमध्ये धारण केले आहे.’ इतरांचे दु:ख त्या किती सहन करतात याची कल्पना येत नाही, इतक्या शांतपणे त्या दुसऱ्याचे दु:ख उचलतात, की अंतर्यामीचा त्रास त्यांच्या चेहऱ्यावर थोडासुद्धा दिसून येत नाही अथवा त्यांच्या बोलण्यातूनही ते आपल्या लक्षात येत नाही. त्यांच्या शरीरातील प्रत्येक पेशी दुसऱ्यांसाठी कार्यरत असते. त्या स्वत:विषयी विचारच करीत नाहीत कारण त्यांना स्वत:पेक्षा दुसऱ्यांवर प्रेम करण्याने अधिक कृतार्थ वाटते.

‘जन्मत:च मला स्वत:विषयीचे ज्ञान होते. मला विशेष काही करावे लागले नाही. मी काही विशेष केले असेल तर माणसाला समजून घेतले. त्यांचे प्रश्न काय आहेत ते समजले. त्यांनी ख्रिस्तांचे अनुयायित्व केले, महंमद साहेबाचे केले. श्रीकृष्णाचे केले, पण आत काहीच उरतले नाही. असे का? कारण ते

सर्वव्यापी शक्तीशी जोडले गेले नव्हते. मग मी काय केले? मी माणसांची विविध प्रकारे परम्युटेशन व काँबिनेशन कार्यान्वित केली. ते अवघड नाही. कारण प्रामुख्याने सात चक्रे कार्यान्वित करायची असतात व कुंडलिनीचे उत्थापन करून सहस्राराचे छेदन करायचे असते. ते कार्यान्वित झाले व हजारो लोकांच्यात होत आहे.

कदाचित, सर्वमासामान्य व्यक्तीस परमेश्वरी कार्याचे साक्षी होण्यास फक्त इतक्या जवळ जाणेच शक्य आहे. श्रीमाताजी महान कारुण्याने सांगतात की, 'मला त्रास होतो त्याचे तुम्हास वाईट वाटायला नको. मी स्वत:स तसे घडविते आहे. ते माझे काम आहे. माझी जबाबदारी आहे.' त्यांच्या जीवनावरून आपल्याला ईश्वरी प्रेम व आनंद म्हणजे काय ते समजते. केवळ धर्म आणि अधर्म एवढेच मानवी जीवनाचे स्वरूप नाही तर जीवनात त्याहूनही बरेच काही आहे. प्रेम, आनंद, करुणा, क्षमाशीलता वगैरे हे सुद्धा आपल्याला समजते. सर्वसामान्य माणसाला ईश्वरत्वाच्या अनुभूतिप्रत उन्नत करणाऱ्या श्रीमाताजी व त्यांचे जीवन म्हणजे साक्षात ईश्वराचे दर्शन आहे.

**सर्वाधिकार सुरक्षित**

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाची दुसरी आवृत्ती किंवा कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा विविध माध्यमांमध्ये रूपांतर जसे इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, झेरॉक्स, पुनर्मुद्रण हे पूर्व परवानगीशिवाय करू नये.

''जर तुम्हाला समजेल की जरी मी सगुण रूपात इथे आहे, तरी मी सगळीकडे आहे. (निर्गुण-निराकार) हे सुद्धा जाणले पाहिजे की हे शरीरसुद्धा मिथ्यास्वरूप आहे.''

.....श्रीमाताजी

Visit us at www.sahajayoga.org to know more about "Sahaja Yoga"